
RNI Regd. No. MAH/MAR/2001/10353





चोखट करूनि अंत:करण। भक्तिभावें करावें पारायण। एक, द्वि, वा त्र्यहनीं करावें पूर्ण। साईनारायण तोषेल।। अथवा करावा सप्ताह गोड। मिळेल पुण्यसंपत्तीची जोड। साई पुरवील मनींचें कोड। भवभय मोड होईल।। प्रारंभ करावा गरुवासरीं। उष:कालीं स्नानानंतरीं। बसावें आपुल्या आसनावरी। उरकूनि सत्त्वरी नित्यकर्म।। मंडप घालावा रम्य विस्तीर्ण। रंभा, कर्दळी, वसनादि करून। उपरी सुंदर आच्छादन। घालून विभूषित करावा।। त्यांत करावें उच्चासन। भोंवतीं काढाव्या भिन्न भिन्न। रंगवल्ल्या रंगपूर्ण। नयनसुभग असाव्या।। साईसद्गुरु–प्रतिमा करून। अथवा सुंदर छबी घेऊन। उच्चासनीं ठेवावी जपून। करूनि वंदन प्रेमभावें।। चीनांशुकीं ग्रंथ बांधोनि। सद्गुरुसन्निध त्या ठेवूनि। पंचोपचारें उभयतां पूजूनि। आरंभ वाचनीं करावा।। व्रतस्थ राहावें अष्ट वासर। करावा गोरस वा फलाहार। अथवा भर्जित धान्यप्रकार। नक्त रुचिर वा एकभुक्त।। प्राचीदिशीं मुख करून। सद्गुरुमूर्ती मनी आठवून। करावें स्वस्थ मनें करून। ग्रंथवाचन मोदभरें।। अष्ट, अष्ट आणिक सप्त। अष्ट, षट्, अष्ट, सप्त। एवं पाठ करावा दिन सप्त। अवतरणिका फक्त अष्टमाहनीं।। अष्टम दिनीं व्रतपारणा। करूनि नैवेद्य साईनारायणा। सुग्रास भोजन आप्तेष्ट–ब्राह्मणां। दक्षिणा यथाशक्ती त्यां द्यावी।। अवंतूनि वैदिक ब्राह्मणां। करावी निशी वेदघोषणा। पयशर्करापान संभावना। देऊनि तन्मना निववावें।। अंतीं वंदूनि सद्गुरुचरणां। अर्पावी त्या उचित दक्षिणा। धाडावी ती भांडारभुवना। संस्थाननिधिवर्धनाकारणें।। येणें तोषेल साईभगवान। देईल भक्ता पसायदान। छेदील भवभय–लेलिहान। दावील निधान मोक्षाचें।।

– श्री साईसच्चरित, अ. ५३, ओ. १८२–१९५

प्रकाशक व मुद्रक दी. म. मुगळीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता हे द्वैमासिक मधुरा प्रिंट सोल्युशन्स्, बी–२४, अंबड, एम.आय.डी.सी., नाशिक–१० येथे छापून साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४ येथे प्रकाशित केले.
संपादक : दी. म. मुगळीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

Printed and published by D. M. Muglikar, Chief Executive Officer on behalf of the Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi and printed at Madhuraa Print Solutions, B-24, Ambad, M.I.D.C., Nashik-10 and published from Sai Niketan, 804-B, Dr. Ambedkar Rd., Dadar, Mumbai – 400 014.
Editor : D. M. Muglikar, Chief Executive Officer, Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi.




श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अधिकृत नियतकालिक

# साईलीला

स्थापना १९२३ । चालू वर्ष ९७ । नूतन नोंदणी वर्ष १९ । अंक ६ । नाव्हेंबर-डिसेंबर २०१९ । पाने ३६ । ₹ ८/-








रशिया व जर्मनी येथील २३ परदेशी साईभक्तांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक मुगळीकर यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र ठाकरे, मुख्य लेखाधिकारी बाबासाहेब घोरपडे व प्रशासकीय अधिकारी आकाश किसवे आदी उपस्थित होते.

---

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## ✻ व्यवस्थापन समिती ✻



डॉ. सुरेश काशिनाथ हावरे
(अध्यक्ष)



ॲड. मोहन मोतीराम जयकर
(सदस्य)



डॉ. राजेंद्र राजाबली सिंग
(सदस्य)




श्री. भाऊसाहेब राजाराम वाक्‌चौरे
(सदस्य)



श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे
(सदस्य)



अर्चनाताई कोते
(पदसिद्ध सदस्य)



दी. म. मुगळीकर, भा.प्र.से.
(मुख्य कार्यकारी अधिकारी)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,
शिर्डीचे अधिकृत नियतकालिक

# साईलीला

स्थापना १९२३ । चालू वर्ष ९७
नूतन नोंदणी वर्ष १९ । अंक ६
नोव्हेंबर-डिसेंबर २०१९ । पाने ३६ । ₹ ८/-

■ संपादक
दी. म. मुगळीकर, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

■ कार्यकारी संपादक
भगवान दातार
ई-मेल : editor.saileela@gmail.com

■ मुखपृष्ठ आणि मांडणी
**इनोव्हेटिव्ह आयडिया, पुणे.**
ई-मेल : innovativeideaads@gmail.com

■ **कार्यालय :** 'साईनिकेतन', ८०४ बी,
डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी : (०२२) २४१६६५५६
फॅक्स : (०२२) २४१५०७९
ई-मेल : saidadar@sai.org.in

■ **शिर्डी कार्यालय** : मु. पो. : शिर्डी - ४२३ १०९,
ता. : राहाता, जि. : अहमदनगर.
दूरध्वनी : (०२४२३) २५८५००
फॅक्स : (०२४२३) २५८७७०
ई-मेल :saibaba@shrisaibabasansthan.org,
saibaba@sai.org.in

■ टपालखर्चासहित वार्षिक वर्गणी : ₹ ५०/-
■ सर्वसाधारण अंकाचे मूल्य : ₹ ८/-
■ श्री साईपुण्यतिथी विशेषांकाचे मूल्य : ₹ १५/-
■ मुद्रण : मधुरा प्रिंट सोल्युशन्स्, बी-२४, अंबड, एम.आय.डी.सी., नाशिक-१०. मो. ७८८७८९७६७८
■ प्रकाशक व मुद्रक दी. म. मुगळीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता हे द्वैमासिक मधुरा प्रिंट सोल्युशन्स्, बी-२४, अंबड, एम.आय.डी.सी., नाशिक-१० येथे छापून 'साईनिकेतन', ८०४ - बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४ येथे प्रकाशित केले.
या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखांतील लेखकांची स्वतंत्र मते असून, त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्वप्रकारच्या हरकती, वादविवाद, मतभेद, हक्क, कायदेशीर कार्यवाही आदी बाबी मुंबई परिक्षेत्रातच उपस्थित करता येतील.

**इंटरनेट आवृत्ती :**
**URL:http://www.shrisaibabasansthan.org**



**प्रभू आले मंदिरी**
: अंजली पर्वते ■ १६



**सेवा, श्रध्दा आणि सबुरी सगळ्यांसाठीच जरुरी**
: डॉ. सुरेश हावरे ■ ८




**साईसेवेसाठी तन-मन-धन**
: भगवान दातार ■ १०



**संगीत हे अध्यात्मच!**
: सुनील देशपांडे ■ २६

## अन्य विशेष

- **श्री साईसच्चरित पोथी**
  : रोहित दामले ■ ५
- **काव्यसरिता** ■ १८
- **श्री शंकर महाराज**
  : मुरलीधर धंबा ■ १९
- **समर्थभक्त मारुतीबुवा रामदासी**
  : मुकुंद फडके ■ २२
- **साई चित्रानुभूती** ■ २५
- **साई प्रश्नमंजुषा** ■ २९
- **शिर्डीतील दसरा उत्सव** ■ ३०
- **भगवद्गीतेविषयीचं गांधींचं चिंतन** ■ ३४



# संपादकीय


विजय पताका श्रीरामाची झळकते अंबरी, 'प्रभू आले मंदिरी' हे कवी योगेश्वर अभ्यंकर यांचं गीत अनेकांना आठवत असेल. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानंतर अयोध्येत असंच वातावरण निर्माण झालं आहे. न्यायालयाचा हा निकाल देशात सौहार्दाचं एक नवं वातावरण निर्माण करणारा आहे. श्री साईबाबांची शिकवण ही अशीच सर्व धर्मांचा सन्मान करणारी आहे. 'सबका मालिक एक' हे त्यांचं वाक्य सर्वश्रुतच आहे. म्हणून तर मानवतेचा आदर्श असलेल्या प्रभू रामांचा जन्मोत्सव साईमंदिरात हर्षोल्हासाने साजरा केला जातो. रावणवध करून श्रीराम अयोध्येत परत आले त्यावेळची आठवण करून देणारा एक अभ्यासपूर्ण लेख आम्ही या अंकात समाविष्ट केला आहे.

दातृत्व हा माणसाचा सर्वात तेजस्वी अलंकार आहे, असं म्हटलं जातं. हे दातृत्व अनाक्रोश असेल आणि दाता प्रसिध्दीपासून दूर असेल तर त्याची उंची अधिकच वाढते. आपलं तन-मन-धन साईचरणी अर्पण करणारे ज्येष्ठ उद्योगपती के. व्ही. रमणी यांचा परिचय करून देणारा लेख हे या अंकाचं वैशिष्ट्य ठरावं. शिर्डीत येणाऱ्या भक्तांच्या निवासासाठी बांधलेला साई आश्रम हे रमणींच्या दातृत्वाचं लखलखणारं प्रतीक आहे. त्यांचा जीवनपट अनेकांना प्रेरणादायी ठरेल.

मागील अंकापासून आम्ही साईदरबारात या शीर्षकाखाली एक लेखमाला सुरू केली आहे. प्रसिध्द गायक अजित कडकडे यांची मुलाखत या अंकात दिली आहे. साईकृपेची अनुभूतीच त्यांनी या मुलाखतीत मांडली आहे.

नव्या रूपातल्या 'साईलीला'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रश्नमंजुषा हे सदर तर अतिशय वाचकप्रिय ठरत आहे. बाबांच्या प्रेरणेमुळे अनेक सन्माननीय लेखकांचा सहभाग वाढत आहे. त्यामुळेच विविध गोष्टींनी सजलेला हा अंक तुमच्या हाती देताना अतिशय आनंद होत आहे. साईंच्या प्रेरणेनेच हे सगळं घडून येत आहे, अशी श्रध्दा मनात ठेवून हा अंक आपणास सादर करत आहोत. आपला अभिप्राय आणि सहभाग आमच्यासाठी लाखमोलाचा आहे.







साईसच्चरित हा ग्रंथ आज लाखो भाविकांच्या घराघरात पोहोचला आहे. १९३० साली प्रसिद्ध झालेला हा ग्रंथ आजही तितक्याच श्रध्देने वाचला जातो. या ग्रंथाची पहिली आवृत्ती नुकतीच संस्थानच्या संग्रहालयात विराजमान झाली. या अतिशय देखण्या आवृत्तीची ही उद्बोधक कथा.

रोहित दामले

# श्री साईसच्चरित पोथी

श्री साईसच्चरित ही श्री साईनाथ महाराजांच्या लीला, अवतार कार्य, बोध, त्या काळच्या घटना, तत्कालीन शिर्डी, श्री साईनाथ महाराजांच्या सहवासातील प्रमुख भक्त व त्यांच्या अनुषंगाने घडलेल्या लीला, उपदेश इ.चे वर्णन असलेली एक प्रासादिक पोथी आहे. या ग्रंथाची रचना श्री बाबांच्या सहवासातील भक्त श्री. गोविंद रघुनाथ दाभोलकर तथा श्री. अण्णासाहेब दाभोलकर यांनी केलेली आहे. अण्णासाहेब १९१० साली प्रथम श्री बाबांच्या दर्शनाला आले होते. त्याच वर्षी शिर्डीच्या आसपास सर्वत्र महामारी या साथीच्या रोगाची लागण झालेली होती. त्या रोगाच्या निवारणार्थ श्री बाबांनी गहू दळून पीठ शिर्डीच्या वेशीवर टाकले व शिर्डीत या रोगाचा प्रवेश होऊ दिला नाही. ही लीला प्रत्यक्ष पाहून अण्णासाहेबांच्या मनात श्री बाबांच्या अशा लीलांवर आधारित काव्यमय (ओवीरूप) ग्रंथ लिहावा अशी इच्छा उत्पन्न झाली हे सर्व भक्तांना ठाऊक आहेच...

अण्णासाहेबांच्या मनात ही सात्त्विक इच्छा उत्पन्न झाली, तरी प्रत्यक्षात या पोथीलेखनाची सुरुवात साधारणपणे १९१७ च्या आसपास झाली होती. तर पोथी १९२९ मध्ये पूर्ण झाली. अण्णासाहेब स्वतः अनेक वर्षे मूळ गुरूचरित्राचे वाचन करीत असत, याचा उल्लेखही श्री साईसच्चरितात आला आहेच (सुमारे ४० वर्षांहूनही अधिक काळ). तेव्हा ते डोळ्यासमोर ठेवूनच



## श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची पहिल्या आवृत्तीची मुद्रित प्रत संस्थानकडे सुपूर्द

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडे श्रीमती अंजली प्रधान (अंजली दाभोलकर) यांनी श्री पुण्यतिथी उत्सवाच्या शुभमुहूर्तावर कै. गोविंदराव रघुनाथ दाभोलकर लिखित १९३० साली प्रसिद्ध झालेल्या श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची पहिल्या आवृत्तीची मुद्रित प्रत सुपूर्द केली असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक मुगळीकर यांनी दिली.

मुगळीकर म्हणाले, श्रीमती अंजली विजयकुमार प्रधान ह्या कै. गोविंदराव रघुनाथ दाभोलकर यांची नात आहेत. श्रीमती प्रधान यांच्याकडे कै. गोविंदराव रघुनाथ दाभोलकर लिखित १९३० साली प्रसिद्ध झालेल्या श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची पहिल्या आवृत्तीची मुद्रित प्रत होती. या ग्रंथाची प्रस्तावना दिनांक २० ऑक्टोबर १९३० रोजी श्री. बाळासाहेब देव यांनी लिहिलेली आहे. या ग्रंथात हरी सीताराम दीक्षित यांचा उपोद्घात आहे. या ग्रंथाची एकूण ९०८ पाने आहेत. तसेच ग्रंथाच्या अनुक्रमणिकेमध्ये दर्शविल्याप्रमाणे विविध प्रकारचे जुने फोटोही आहेत.

श्री साईसच्चरित या ग्रंथाची पहिल्या आवृत्तीची मुद्रित प्रत श्री साईबाबा संस्थानला भेट म्हणून कायमस्वरूपी देण्याची विनंती मी श्रीमती अंजली प्रधान यांना केली होती. त्यानुसार त्यांनी श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची मूळ प्रत श्री साईबाबा संस्थानकडे सुपूर्द केली आहे. संस्थानच्या वतीने सदरच्या ग्रंथाची प्रत सुरक्षित ठेवण्यात येईल. तसेच या ग्रंथाच्या प्रतीचे डिजिटायझेशन करण्यात येणार असल्याचेही मुगळीकर यांनी सांगितले.

त्यांनी श्री साईसच्चरिताची रचना केली असावी, असे जाणवते. श्री बाबांनी १५ ऑक्टोबर १९१८, मंगळवारी महासमाधी घेतली त्या सुमारास या पोथीचे किती अध्याय लिहून पूर्ण झाले होते याची नक्की माहिती उपलब्ध नाही. तसेच श्री बाबांच्या महासमाधीची घटना पाहून श्री साईसच्चरिताची रचना साधारण १९१९ मध्ये सुरू झाली असावी असाही एक मतप्रवाह आहे. मध्यंतरीच्या काळात सुमारे १९२१ मध्ये श्री साईबाबा संस्थान शिर्डी या नावाने

संस्था अस्तित्वात आली. याचे श्रेय श्री काकासाहेब दीक्षितांचे आहे. (याचा उल्लेख 'निर्वाणीचा सखा' या दुर्मिळ पुस्तकात आहे.) संस्थानची स्थापना झाल्यानंतर श्री बाबांच्या अवतारकार्याचा प्रचार व प्रसार व्हावा, श्री बाबा देहावतारात असताना भक्तांना वैयक्तिकरीत्या आलेल्या अनुभूती व महासमाधीनंतरचे काही अनुभव व या लेखन चालू असलेल्या पोथीची माहिती व्हावी या काही विशिष्ट उद्देशाने श्री साईलीला मासिकाची सुरुवात १९२३ साली करण्यात आली. श्री साईलीला मासिकाचा प्रत्येक महिन्याला अंक प्रकाशित होत असे. यात श्री साईसच्चरिताचे जे अध्याय पूर्ण झाले होते ते छापायला सुरुवात झाली...

श्री साईलीला अंक १९२३ ते १९४४ असा सलग चालू होता; पण काही अपरिहार्य कारणामुळे १९४४-४७ असे सुमारे ३ वर्ष अंक बंद होता. पण त्या नंतर श्री बाबांच्या कृपेने आजतागायत अंक सुरू आहे. पोथीलेखन व अध्याय अंकात प्रसिद्ध करणे हे कार्यसुध्दा सलग चालू होते. पोथीच्या उपोद्घातमध्ये काकासाहेब दीक्षितांनी असा उल्लेख केला आहे की आजमितीस या पोथीचे ३५ अध्याय लिहून पूर्ण झाले आहेत. या वरून पोथीलेखनाचे काम व्यवस्थित रीत्या व खंड न पडता सुरू होते असे जाणवते. पुढे काकासाहेब दीक्षित १९२६ साली श्री साईचरणी विलीन झाले. तर अण्णासाहेब दाभोळकर १९२९ मध्ये श्री साई चरणी विसावले. निधनापूर्वी थोडेच दिवस अण्णासाहेबांनी पोथीचा ५२वा अध्याय लिहून पूर्ण केला होता व अध्यायाच्या शेवटी 'श्री सद्गुरूचरणी लेखणी मस्तक अर्पितो' या भावनेने जणू कार्य पूर्ण झाल्याचा उल्लेख केला होता...

१९२९ मध्ये पोथीचे ५२ अध्याय पूर्ण झाले; फक्त सर्व अध्यायांचे

**श्री साईसच्चरित ग्रंथ पूर्ण झाल्यावर तो रामचंद्र आत्माराम तर्खड यांच्या देखरेखीखाली मुंबईच्या छापखान्यात छापून एकत्रित पोथी रूपाने १९३० साली प्रथम प्रसिद्ध झाला.**

सिंहावलोकन करणारी अवतरणिका लिहायची बाकी होती. तेवढ्यात अण्णासाहेब श्रीचरणी विलीन झाले. तेव्हा ही अवतरणिका पूर्ण कशी करायची, हा प्रश्न उभा राहिला. बाळकृष्ण विश्वनाथ उर्फ बाळासाहेब देव व श्री साईलीला मासिकाचे संपादन करणारे रामचंद्र आत्माराम तर्खड यांनी या विषयी विचार करून श्री साईलीला मासिकात ही अवतरणिका पूर्ण होणे विषयी निवेदनसुध्दा दिले होते. पण सुमारे ६ महिन्यांची मुदत घालूनही हे कार्य पूर्ण करायला वेळ होऊ लागला. तेव्हा बाळासाहेब देवांनी आपणहून पुढाकार घेऊन श्री सद्गुरुकृपेने अवतरणिका पूर्ण करून ग्रंथाला जोडली. देवांनी लिहिलेली अवतरणिका सुंदर झाली आहेच, यात शंकाच नाही; पण विशेषकरून सुरुवातीच्या ओव्यांमध्ये देवांनी केलेला एक उल्लेख फार महत्त्वाचा आहे.... ही अवतरणिका अवतरेना म्हणून काय केले, याबद्दल देव लिहितात की 'केली दत्तगुरूंची प्रार्थना.' हे दत्तगुरू म्हणजे श्री साईनाथ महाराज होत याची तळटीप अवतरणिकेच्या त्या पानावर आहे...

श्री साईसच्चरित ग्रंथ पूर्ण झाल्यावर तो रामचंद्र आत्माराम तर्खड यांच्या देखरेखीखाली मुंबईच्या छापखान्यात छापून एकत्रित पोथी रूपाने १९३० साली प्रथम प्रसिद्ध झाला... पहिल्या आवृत्तीची सजावट व मांडणीसुध्दा फार सुंदर केलेली आहे. यात प्रत्येक अध्यायाच्या पानावर सुरुवातीला व शेवटी काही ठिकाणी देवतांची, देवदूतांची, फुलांची व काही बाकी नक्षी असलेली छोटी चित्रे छापण्यात आली होती. तर अध्यायांच्या अधे-मधे श्री बाबांची काही मूळ छायाचित्रे (कॅमेरा फोटो), छापले होत. यामध्ये शिळेवर बसलेले श्री साईबाबा, धुनीचा फोटो, श्रींचे समाधीमंदिर १९२१ साली कसे होते, त्याचबरोबर वेगवेगळ्या अँगलमधून दिसणारे श्री समाधी मंदिर, श्रींचा द्वारकामाई शेजारून लेंडीबागेत जायचा रस्ता, चावडी, रामनवमी उत्सवातील कावडींचा व निशाण मिरवणुकीचा फोटो, श्री बाबा-म्हाळसापती-शामा यांचा एकत्रित फोटो, श्री बाबांचा लेंडीवर जातानाचा छत्रीसह असलेला फोटो, जुन्या लेंडीबागेतील शिवेचा ओढा, लेंडीबागेतील झाडाखाली देवळीत असणारा नंदादीप, श्रींच्या नंतरच्या काळातील लेंडीबाग, श्यामकर्ण घोडा, तसेच काकासाहेब दीक्षित, अण्णासाहेब दाभोलकर, नानासाहेब चांदोरकर, दासगणू महाराज व स्तवनमंजरी लिहून घेणारे त्यांचे शिष्य दामोदर आठवले इ. श्रींच्या सहवासातील भक्तांचे फोटो असे पोथीचे स्वरूप नितांत सुंदर व श्री बाबांच्या देहधारी असणाऱ्या अमृतमय सहवासाची आठवण करून देणारे होते...

अशा प्रकारे श्री साईसच्चरित पोथीचा इतिहास व प्रवास घडलेला आहे.

श्री बाबांच्या कृपेने व परमभाग्याने माझ्याकडे या श्री साईसच्चरिताच्या पहिल्या आवृत्तीची संपूर्ण झेरॉक्स प्रत आहे. जुन्या प्रथम आवृत्तीवरून ही प्रिंट बनवल्याने काही पाने काळपट आलेली आहेत तरीही पहिली आवृत्ती कशी होती या आठवणीसाठी मी ती प्रत जतन केलेली आहे.

■■■



# सेवा, श्रध्दा आणि सबुरी सगळ्यांसाठीच जरुरी

## – डॉ. सुरेश हावरे

**श्रद्धा आणि भक्ती तर हवीच, पण ती समाजाच्या सेवेत परिवर्तीत झाली तर सहजपणे परमेश्वरापर्यंत पोहोचते असं आग्रहाने सांगणारे आणि याच भूमिकेतून साई संस्थानच्या कार्याला भक्ताभिमुख बनवणारे संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे यांच्याशी केलेल्या संवादातून व्यक्त झालेले त्यांचे मनोगत.**

शासनाच्या एका आदेशाने मी शिर्डीच्या साई संस्थानशी प्रत्यक्षपणे जोडला गेलो आणि त्या कामातून मला सद्‌गुरू साईबाबांच्या सेवा, श्रध्दा आणि सबुरी या शिकवणुकीचा प्रत्यय आला. श्रद्धेशिवाय माणूस जगू शकत नाही. ज्याला श्रद्धा नाही तो माणूसच नाही. आपली श्रद्धा व्यवहारीक पण असते. म्हणजे ज्या डॉक्टरवर आपला विश्वास आहे त्याच डॉक्टरकडे आपण जातो. हा विश्वास, श्रद्धेतून निर्माण होतो. त्यासोबत माणसाच्या वागण्याला

**प्रतिनिधी**

मर्यादित बांधण्यासाठी सबूरीही अत्यंत जरूरी आहे. प्रत्येक गोष्टीला काही ठराविक वेळ लागतच असतो. तेंव्हा तेवढा धीर धरण्याचा स्वभाव बनला पाहिजे. अधीर होऊन चालणार नाही. म्हणून श्रद्धा आणि सबूरी हा बाबांनी दिलेला मंत्र माणसाच्या जीवनाचे एक प्रभावी साधन आहे. त्याबरोबरच बाबांनी एक तंत्र दिलेले आहे आणि ते आहे सेवेचे. स्वत:च्या वागण्यातून त्यांनी ही शिकवण दिली आहे. मी तर असे अनुभवले की बाबांच्या लीला देखील सेवेसाठीच होत्या. म्हणून सेवेचे जे तंत्र बाबांनी दिले आहे त्यावर अंमल होणे आवश्यक आहे. परमेश्वरावर श्रद्धा म्हणजे नेमके काय असा मी विचार केला तेंव्हा मला प्रकर्षाने जाणवलं की श्रद्धा ही सेवेत परिवर्तीत झाली पाहिजे. त्यामुळेच साई भक्तांच्या सेवेला व त्यांच्या सुविधांना मी सर्वाधिक महत्व दिलं. साईंच्या दर्शनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भक्तांना दर्शन तर सुलभपणे मिळावंच, पण त्यांचं शिर्डीतलं वास्तव्यही सुखकर व्हावं असं मला वाटत होतं. त्याचबरोबर शिर्डी



संस्थान हे केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्याही नकाशावर यावं असं मला वाटतं. याचसाठी आम्ही संस्थानच्या माध्यमातून अनेक महत्वाकांक्षी व लोकोपयोगी प्रयोग राबवले.

बाबांवरील श्रध्देपोटी मी विविध उपक्रम हाती घेतले. त्यांना अधिकाधिक भक्ताभिमुख बनवलं. टीकेमुळे किंवा विरोधामुळे खचून न जाता ते यशस्वी होण्यासाठी निष्ठेनं आणि अथकपणे काम केलं. खरोखर सेवा, श्रध्दा आणि सबुरी ही सगळ्यांच्याच दृष्टीने जरुरी आहे हे मी या सगळ्या अनुभवातून शिकलो. भक्ताभिमुख आणि स्वच्छ व पारदर्शक कारभार हेच माझ्या कामाचं मुख्य सूत्र आहे.

आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या अध्यक्षपदावर माझी निवड केल्यामुळे मी ही जबाबदारी स्वीकारली. त्यांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी मी जिवापाड मेहनत घेतली.

साईबाबा समाधीचे शताब्दी वर्ष २०१७ च्या दसऱ्यापासून २०१८ च्या दसऱ्यापर्यंत साजरे झाले. या कालखंडात मला जबाबदारी मिळणं हे मी माझं मोठं भाग्यच समजतो. या काळात आदरणीय राष्ट्रपती रामनाथ कोविंद, मा. उपराष्ट्रपती व्यंकय्या नागडू, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांतदादा पाटील, राज्य केंद्रीय मंत्रिमंडळातील अनेक मान्यवर सदस्य, आदरणीय रामदेव बाबा, सरसंघचालक मोहनजी भागवत यासारख्या अनेक मान्यवरांचं स्वागत करण्याची व त्या निमित्ताने शिर्डी संस्थान राबवत असलेल्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याची संधी मला मिळाली.

गेल्या तीन वर्षात आणि विशेषतः समाधी शताब्दी वर्षात भक्तांसाठी राबवलेल्या विविध उपक्रमातून निर्माण झालेल्या सोयी आता सगळ्यांना प्रत्यक्ष अनुभवता येत असतील. दर्शनासाठीचं संगणकीय बुकींग, दर्शन रांगेची व्यवस्था, निवास, प्रसाद, ध्यानमंदिर यांच्या सोय़ी अद्ययावत करण्याचा आम्ही प्रयत्न केला. त्याबरोबरच शिक्षण संकुल, साई नॉलेज पार्क, रक्तदान मोहिम, यासारख्या मोठ्या योजना राबवल्या. संस्थानची दोन्ही हॉस्पिटल्स अधिकाधिक अद्ययावत करण्याचा प्रयत्न केला.



राष्ट्रपती रामनाथजी कोविंद यांना निमंत्रण देताना डॉ. सुरेश हावरे.

साई लीला सर्वदूर परिचित आहेत, पण साईसेवेवर जरा पडदा पडलेला दिसतो असे जाणवले. बाबांनी भिक्षा मागून, स्वतः दळून-शिजवून लोकांना जेवू घातलं. रुग्णांची शुश्रुषा केली. गोसेवा केली, झाडं लावली, निसर्ग जपला. म्हणून हाच आदर्श डोळ्यापुढे ठेवून साईबाबा संस्थान, शिर्डीद्वारे मोठ्या प्रमाणावर सेवा दिली जाते. मग यात भले मोठे ग्रीन कीचन असलेले प्रसादालय येते, ५५० बेडची दोन हॉस्पिटल्स येतात, शाळा कॉलेजांचे शैक्षणिक जाळे येते, हजारोंच्या निवासाची सोय येते व ही सेवा अविरत, वर्षातले ३६५ दिवस सुरु असते.

भक्तांकडून साईबाबांच्या समाधीवर वाहिल्या जाणाऱ्या फुलांपासून अगरबत्ती निर्माण करण्याचा यशस्वी प्रयोग संस्थानने केला. आज या अगरबत्ती उद्योगात २०० महिलांना रोजगार मिळाला आणि साईंच्या भक्तीचा सुगंध अगरबत्तीच्या माध्यमातून घराघरात पसरला.

माझा सर्वात समाधान देणारा प्रयोग होता शिर्डी स्वच्छ करण्याचा. शिर्डी नगर पंचायतीच्या सहकार्याने घन कचरा व्यवस्थापनाचा प्रकल्पही उभा राहतो आहे. त्यातून खत, गॅस, वीजनिर्मिती होऊ शकते. मंदिराचं विजेचं बिल कमी करण्यासाठी व मंदिराला विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी १० मेगा वॉट क्षमतेचा सोलर पॉवर प्लँट उभारण्याचा निर्णय आम्ही घेतला. त्याची प्रक्रिया सुरु आहे. भक्तांनी जेवतांना पानात टाकलेलं सुमारे पाच टन अन्न रोज वाया जात असे. त्यावरही आम्ही अनेक उपाय शोधले. प्रसादालयात नव्या टाईल्स घालून वाटपाच्या गाडीतून अन्न सांडण्याचं प्रमाण जवळजवळ बंद केलं. वाढपाच्या ओगराळ्यांचा आकार लहान केला.

त्यामुळे अनावश्यक अन्न वाढणं कमी झालं. त्यामुळे अन्न वाया जाण्याचं प्रमाण आज पाऊण टनावर आले आहे. म्हणजे आज दरडोई केवळ १९ ग्रॅम अन्न वाया जात आहे. ते गॅस प्लँटमध्ये टाकून त्यातून गॅस व खत निर्माण केले जाते.

स्वच्छ शिर्डी, रक्तदान महायज्ञ, निर्माल्यातून अगरबत्ती, साई सेवक योजना आदी उपक्रम याच भूमिकेतून राबवले. अनेक उपक्रम आज चांगल्या स्थितीत चालू आहेत. मेडिकल कॉलेज, कॅन्सर हॉस्पिटल, नर्सिंग कॉलेज यासारखे काही उपक्रम राबवण्याचे स्वप्न अजुनही कायम आहे.

मंदिर हे भारतीय संस्कृतीतील अतिशय प्रभावी केंद्र आहे. समाज परिवर्तनाच्या कार्यात मंदिराचा फार मोठा वाटा असू शकतो. या मंदिरांची आर्थिक उलाढालही प्रचंड आहे. दुर्दैवाने सध्याच्या काळात देशातील बहुतांश मंदिरे विस्कळीत आणि दुर्लक्षित आहेत. देशात साडेसहा लाख गावं आहेत. २० लाख शाळा-महाविद्यालयं आहेत आणि सुमारे ३० लाख मंदिरं आहेत. ही मंदिरं समाजाभिमुख, भक्ताभिमुख आणि सेवाभिमुख बनली तर समाजात फार मोठं परिवर्तन होईल.

या मंदिरांची उलाढाल इतर अनेक उद्योगांपेक्षा अधिक आहे. रोजगार क्षमताही सर्वाधिक आहे. एवढं प्रभावी माध्यम आज कमालीचं दुर्लक्षित आहे. त्यामुळे या माध्यमाचं व्यवस्थापन सुधारण्यासाठी मंदिर व्यवस्थापनाचा एखादा अभ्यासक्रम, राज्य किंवा केंद्रीय स्तरावर सुरु होणे गरजेचे आहे. शिर्डी हे अशा अभ्यासक्रमाचं केंद्र बनू शकेल असा मला विश्वास वाटतो. देशात रेल्वेमध्ये सर्वाधिक कर्मचारी असल्याचं मानलं जातं. रेल्वेसाठी कुठलाही स्वतंत्र अभ्यासक्रम नव्हता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही गरज लक्षात घेतली आणि



रेल्वे विद्यापीठाची संकल्पना मांडली. मंदिर व्यवस्थापनाचाही एक असाच अभ्यासक्रम तयार करता येईल. त्यासाठी टेंपल युनिव्हर्सिटी होऊ शकते.

मंदिरांची उलाढाल व त्यांचा समाजावरील प्रभाव पाहता मार्केटिंग, फायनान्स, मनुष्यबळ विकास, हॉटेल व्यवस्थापन या धर्तीवर मंदिर व्यवस्थापन हाही अभ्यासाचा विषय होऊ शकतो.

यातून मंदिरांची योग्य व्यवस्था लागल्याने भाविकांना समाधान तर वाटेलच, पण फार मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होईल. परदेशातही आज अध्यात्म आणि पूजापाठ यांचं महत्व खूप वाढलं आहे. त्यामुळे अशा प्रशिक्षित तरुणांना परदेशातही रोजगाराची संधी मिळेल. शिवाय परदेशातीलही अनेक तरूण या विषयाचा अभ्यास करण्यासाठी भारतात येऊ शकतील.

मी एकदा मुंबई विद्यापीठात कलिना कॅंपसमध्ये वाणिज्य विभागाच्या एका परिसंवादासाठी गेलो होतो. हजाराहून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनी परिसंवादाला हजर होते. सहजच मी विचारलं, तुमच्यापैकी कितीजण शिर्डीला गेलेले आहेत? ९० टक्के हात वर झाले. मी पुढे संस्थानची रुग्णसेवा, हॉस्पिटल्स, शाळा - महाविद्यालये, रक्तदान इत्यादींबद्दल विचारणा केली. तेंव्हा असं समजलं की त्याची कुणालाच माहिती नाही. म्हणजे अनेकांना साईबाबा, साईमंदिर, साईदर्शन, तीर्थप्रसाद यापलीकडे फारशी माहिती नाही. साई भक्तांना व सर्वसामान्य जनतेला ही माहिती मिळावी यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न केले.

साईबाबांचा प्रभाव सर्वदूर जाणवतो.. जगातील ४० देशांमध्ये जवळपास ४५० साई मंदिरे आहेत. भारतातील साई मंदिरांची संख्या आहे सुमारे ८ हजार. या सगळ्या मंदिरांच्या उपक्रमात एकवाक्यता आणून त्यांना एका सूत्रात गुंफण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यादृष्टीने आम्ही साई मंदिरांच्या जागतिक परिषदेचं दोन वेळा आयोजन केलं.

साईंची सेवा करण्याची संधी मिळाली हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा ईश्वरी आशीर्वाद आहे अशी माझी प्रामाणिक भावना आहे. अध्यक्षपदाच्या काळात माझं आयुष्य पूर्णतः बदलून गेलं. साईबाबांचा पूर्वी कधी विचार करत नव्हतो. पण या काळात साईंशिवाय दुसरा कुठला विचार केला नाही. शिर्डीला कधी जात नव्हाते. पण या काळात शिर्डीशिवाय कुठे गेलो नाही. पावलांना कायम शिर्डीचीच ओढ असायची.

साईसेवेसारखा दुसरा आनंद नाही. ही केवळ माझीच भावना आहे असं नाही, तर ती सर्व साईभक्तांचीच भावना आहे. साई सेवेचा आणि साई भक्तीचा हा आनंद सर्वानाच मिळत राहो अशीच माझी साईचरणी प्रार्थना आहे.


■■■

# श्री साईबाबा संस्थानची उपयुक्त दैनंदिनी

## प्रसिद्ध झाली!

### ठळक वैशिष्टे

- श्री साईबाबांचे भक्तांना अभय (११ वचने)
- श्री साईबाबांच्या चारही आरत्या
- श्री साईबाबांची अष्टोत्तरशतनामावली:
- श्री साईबाबांच्या वर्षभरातील सर्व उत्सवांची माहिती
- श्री साईबाबांच्या वर्षभरातील सर्व रथ व पालख्यांची माहिती
- श्री साईबाबांच्या व संस्थानमार्फत राबविल्या जात असलेल्या उपक्रमांचे फोटो
- वर्षभरातील ग्रहणांची माहिती
- श्री साईबाबांच्या मंदिरातील दैनंदिन कार्यक्रमांची माहिती
- श्री साईबाबांच्या मंदिरपरिसरातील इतर पवित्र स्थाने
- शिर्डी परिसरातील रेल्वे व विमानसेवा वेळापत्रक




**किंमत**
**रु. ९०/-**

## ‘साईलीला’च्या वर्गणीसाठी

संस्थान प्रकाशित ‘साईलीला’ द्वैमासिक नियतकालिकाच्या सर्वसाधारण सभासदांनी त्यांची पुढील वर्गणी, चालू वर्गणी संपण्यापूर्वी दोन महिने अगोदर भरावी. नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या साईभक्तांना कोणत्याही दिवशी वर्गणी भरता येईल; मात्र त्यांना वर्गणी भरल्यानंतर दोन महिन्यांनी अंक येणे सुरू हाईल.

वर्गणी प्रत्यक्ष/मनीऑर्डर/धनादेश (चेक)/धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) द्वारा भरता येईल. धनादेश (चेक)/धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi या नावे असावा.

**मुंबई कार्यालय :** ‘साईलीला’, ८०४ बी, साईनिकेतन, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर (पूर्व), मुंबई – ४०० ०१४.

**शिर्डी कार्यालय :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, मु. पो. शिर्डी – ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर

इतर ठिकाणाहून थेट वर्गणी भरण्यासाठी संस्थानच्या **online.sai.org.in** या संकेतस्थळावरही सुविधा उपलब्ध आहे.




# साईसेवेसाठी तन-मन-धन

भगवान दातार

दातृत्व हे अनाक्रोश आणि प्रसिध्दीपासून दूर असेल तर त्याची उंची अधिकच वाढते. त्यामुळे समर्पण भाव हाच दातृत्वाचा पाया असला पाहिजे. अशा समर्पण भावनेने तुम्ही बाबांना सर्वस्व अर्पण केलंत की मग तुम्ही बाबांचे होता आणि बाबाच तुमची सर्वार्थाने काळजी घ्यायला लागतात.

'तुमचा मी भार वाहीन सर्वथा,' असं वचनच सद्‌गुरू साईबाबांनी भक्तांना दिलं आहे. बाबा भक्तांची सर्वतोपरी काळजी घेतात, असा अनुभव नेहमीच सगळ्यांना येतो. शिर्डीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. भारताच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भक्तांना जास्तीत जास्त सोयी उपलब्ध व्हाव्यात, याची काळजी बाबाच घेत असावेत. कारण, त्यामुळेच या सोयी निर्माण व्हाव्यात यासाठी काम करण्याची प्रेरणा बाबा अनेकांना देत असावेत. याच प्रेरणेतून अनेक दानशूर व्यक्ती पुढे आल्या आणि त्यांनी दिलेल्या निधीतून शिर्डीत वेगवेगळे प्रकल्प उभे राहिले. या सगळ्यांत प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो चेन्नईचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे उद्योगपती के. व्ही. रमणी यांचा. शिर्डीत भक्तांच्या निवासासाठी उभारण्यात





आलेला साई आश्रम हा सर्वांत मोठा भक्त निवास प्रकल्प रमणी यांनी दिलेल्या आर्थिक मदतीतून उभा राहिला आहे. मात्र, त्यामागे बाबांची प्रेरणा हेच मुख्य कारण आहे, असं ते नम्रपणे मानतात. हे आव्हानात्मक काम बाबांनीच आपल्या हातून करवून घेतलं, अशी त्यांची भावना आहे.

**शतेषु जायते शूरः – सहस्त्रेषुच पंडितः वक्ता दश सहस्त्रेषु – दाता भवति वा न वा –**

असं एका संस्कृत सुभाषितात म्हटलं आहे. औदार्य किंवा दातृत्व हा माणसाचा सर्वांत मोठा गुण आहे, असं हे सुभाषित सांगतं. श्री. रमणी यांनी केवळ सेवाभावनेतून दिलेल्या देणग्यांतून उभं राहिलेलं काम पाहिलं की याची प्रचीती येते.

६९ वर्षांचे के. व्ही. रमणी हे चेन्नईतील नामवंत उद्योगपती आहेत. रमणी यांचा जन्म चेन्नईजवळच्या मालापोर मधला. वडील कृष्णमूर्ती अय्यर हे व्यवसायानं वकील. तिरुपती हे त्यांच्या घराण्याचं दैवत होतं. साईबाबांविषयी मात्र त्यांना फारशी माहिती नव्हती. कधीतरी ते स्थानिक देवळात दर्शनाला जात असत. त्या लहान वयात 'परीक्षेत चांगलं पास कर,' एवढंच त्यांचं देवाकडे मागणं असे. सॉफ्टवेअरच्या क्षेत्रात त्यांनी १९७० च्या सुमारास नोकरी सुरू केली. सुमारे १५ वर्षे त्यांनी विविध देशांत जबाबदारी सांभाळली. नंतर त्यांनी याच क्षेत्रात आपला उद्योग सुरू केला आणि अवघ्या काही वर्षांत त्यांच्या 'फ्यूचर सॉफ्टवेअर' या कंपनीने या क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला. नंतर त्यांनी ह्यूजेस या अमेरिकन कंपनीशी भागीदारी करून 'ह्यूजेस सॉफ्टवेअर सिस्टिम्स' ही कंपनी स्थापन केली. दिल्लीत असताना सॉफ्टवेअर क्षेत्रातील काही मंडळींना या क्षेत्राच्या वाढीसाठी एक वेगळी संघटना स्थापन करावी, असे वाटले. त्यापैकी ७ प्रमुख उद्योजकांनी एकत्र येऊन 'नॅस्कॉम' ही कंपनी स्थापन केली. नॅस्कॉम या सॉफ्टवेअरमधील आंतरराष्ट्रीय कंपनीचे ते संस्थापक आणि माजी चेअरमन होते. उद्योगाचा पसारा सांभाळत असतानाच ते साईभक्तीकडे अधिकाधिक आकर्षित होत गेले. याला कारणही तसंच घडलं.

१९७७ मधील एका घटनेने त्यांचं सगळं जीवनच बदलून टाकलं.

त्यांचे एक जवळचे नातेवाईक अतिशय आजारी होते. रुग्णालयात त्यांच्यावर उपचार चालू होते. त्यांच्या आजाराचं निदान होत नव्हतं, प्रकृती खूपच चिंताजनक होती. डॉक्टरांनी तर सगळी आशाच सोडून दिली होती. कोणत्याही क्षणी त्यांची प्राणज्योत मालवेल अशी स्थिती होती. त्यावेळी तिथं असलेल्या रमणींनी मनोभावे साईबाबांना प्रार्थना केली. 'त्यांची



प्रकृती सुधारु दे; मी दर गुरुवारी नियमाने तुमचे दर्शन घेईन,' असं ते म्हणाले आणि आश्चर्य म्हणजे अवघ्या दोन तासांत रुग्णाची प्रकृती सुधारली. डॉक्टरांनाही आश्चर्य वाटलं. त्यांना दुसऱ्याच दिवशी रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं. तेंव्हापासून गेली ४० वर्षं रमणी दर गुरुवारी साईबाबांचं दर्शन घेऊन मनोभावे आरती करतात.

त्या दिवसापासून त्यांची साईभक्ती वाढतच गेली. साईंशी ते अधिकाधिक एकरूप होत गेले आणि आपलं तन, मन, धन असं सर्वस्वच जणू त्यांनी साईसेवेत अर्पण केलं.

रमणी यांनी १९९६ मध्ये शिर्डी साई ट्रस्टची स्थापना केली. या ट्रस्टमार्फत ते समाजसेवेचे अनेक उपक्रम राबवत असतात. प्रसिध्दीपासून दूर राहून ते या प्रकल्पांना भरघोस मदत करत असतात. त्यांनी चेन्नई इथं समुद्रकिनाऱ्यावर साईंचं एक मंदिर स्थापन केलं आहे. या मंदिराच्या मार्फत त्यांच्या ट्रस्टचे काम चालते. सगळ्यात महत्त्वाची आणि रमणी यांचे वेगळेपण सांगणारी गोष्ट म्हणजे त्यांनी स्थापन केलेल्या मंदिरात दानपेटी नाही. ते कोणाकडूनही देणगी स्वीकारत नाहीत. या ट्रस्टतर्फे विविध गावांमधील साईमंदिरांच्या उभारणीसाठी मदत केली जाते. गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, गरजू लोकांना वैद्यकीय मदत, दुर्बल घटकातील लोकांना अन्न, वस्त्र देणं, साईभक्तांना साईबाबांविषयीच्या पुस्तकांचं मोफत वाटप करणं या प्रकारचं काम या ट्रस्टतर्फे केलं जातं. आतापर्यंत देशभरातील ४५० मंदिरांना या ट्रस्टने मदत केली आहे. ट्रस्टने गरीब विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी ५३ लाख याप्रमाणे ९ कोटी रुपयांची मदत, गरीब रुग्णांसाठी दरवर्षी ४० लाख याप्रमाणे १५ कोटी रुपयांची मदत केली आहे. दरवर्षी ५ हजार हृदय शस्त्रक्रियांसाठी मदत केली जाते. याचबरोबर विविध संस्थांकडून होणाऱ्या अन्नदानासाठी दरवर्षी ३० लाख याप्रमाणे ६ कोटी रुपयांच सहाय्य केलं जातं.

या ट्रस्टतर्फे चेन्नईजवळ एक विद्यापीठ सुरू करण्याची रमणी यांची योजना आहे. देशातलं हे पहिलं खासगी विद्यापीठ असेल. या विद्यापीठासाठी रमणी यांनी २५० कोटीची देणगी दिली आहे. सॉफ्टवेअर तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक शिक्षणावर या विद्यापीठाचा भर राहणार आहे.

साईभक्त असलेले श्री. रमणी अनेकदा शिर्डीला दर्शनासाठी येतात. बाबांची इच्छा असेल तरच हे दर्शन घडतं, अन्यथा त्यात अनेक अडथळे येतात, अशी त्यांची श्रध्दा आहे. शिर्डीत दर्शनाला आले म्हणजे प्रवेशद्वारातून आत येताच लोटांगण घालून बाबांना नमस्कार करतात. त्यानंतर शिर्डीच्या मुक्कामातला जास्तीत जास्त वेळ ते बाबांच्या दर्शनात व्यतीत करतात.

अशाच एका प्रसंगी प्रचंड संख्येने येणाऱ्या भक्तांच्या राहण्याची काय सोय केली जाते, असा प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाला. उपलब्ध निवास मिळवण्यासाठी भक्तांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे त्यांनी पाहिलं. या रांगेत वेगवेगळ्या राज्यांतून आलेल्या लोकांचा समावेश होता. रमणींनी या लोकांशी थेट चर्चा केली. अनेक लोक मिळेल त्या ठिकाणी जसं जमेल तसं रहात होते. बाबांच्या दर्शनाची आस मनात धरून आलेल्या या भक्तांना कुठल्याही त्रासाची तमा नव्हती.

त्यांची ती अवस्था पाहून रमणी यांचं मन कष्टी झालं. या भक्तांच्या निवासाच्या सोयीसाठी काहीतरी केलं पाहिजे, अशी भावना त्यांच्या मनात निर्माण झाली. त्यांनी भक्तनिवास बांधून देण्याविषयीचा प्रस्ताव शिर्डी संस्थानला सादर केला. संस्थानने जमीन दिल्यास आपण तिथं आपल्या खर्चाने भक्तनिवास बांधून देऊ अशा स्वरूपाचा तो प्रस्ताव होता.

संस्थानने २० एकराची जागा दिली. नवी दिल्ली येथील प्रदीप जैन यांच्या पार्श्वनाथ डेव्हलपर्स कंपनीने बांधकामाची जबाबदारी घेतली.

बांधकामासाठी लागणारे ११२ कोटी रुपये श्री. रमणी यांनी दिले. १० जानेवारी २००८ ला सुरू झालेलं काम ११ एप्रिल २०१३ ला संपलं आणि पाहता पाहता 'साई आश्रम' हा भव्य भक्तनिवास उभा राहिला. सुमारे १४.५ एकर जागेवर हा प्रकल्प उभा आहे. या भक्तनिवासात १२ मोठ्या इमारती असून, त्यात १५३६ खोल्या आहेत. यातील ३८० खोल्या वातानुकूलित आहेत. यात ७६८० भक्तांची सोय होऊ शकते. प्रकल्पाच्या बाह्य परिसराच्या विकासाचं व सौंदर्यीकरणाचं काम शापूरजी पालोनजी या कंपनीला देण्यात आलं होतं. वास्तुशास्त्राचा अद्वितीय नमुना ठरावा असा हा भक्तनिवास श्री. रमणी यांच्या आर्थिक साह्यातून आणि तळमळीतून उभा राहिला आहे.

भक्तनिवास उभारणीच्या काळात रमणी बांधकामावर जातीनं लक्ष ठेवून होते. या काळात ते अनेकदा शिर्डीत येत होते. या काळात रमणींनी साई संस्थानच्या अन्य अनेक उपक्रमांमध्ये भरघोस मदत केली. यापैकी काही उल्लेखनीय बाबी पुढील प्रमाणे –

१) २००४ मध्ये श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी १ कोटीची मदत.

२) २०१३ मध्ये १२ माहिती कियॉक्स बसवण्यासाठी १५ लाख ४८ हजार रुपयांची देणगी.

३) २०१४ मध्ये साई आश्रमसाठी ११० डायनिंग टेबलांसाठी २४ लाख २० हजार रुपयांची देणगी.

४) २०१४ मध्ये भक्तनिवास ते साईमंदिरापर्यंत मोफत बस सेवेसाठी ६६ लाख ५० हजार रुपयांच्या देणगीतून ५ बसेस दिल्या.

५) २०१४ मध्ये श्री साईबाबा ऑक्सिजन प्लँटसाठी २२ लाख रुपयांची मदत.

६) २०१४ मध्ये इंटेलिव्हो मॉनिटरसाठी श्री साईबाबा हॉस्पिटलला १६ लाख रुपयांची देणगी.

५) २०१४ मध्ये संगणक सुविधा व संगणकीय साहित्याकरिता ७ लाख १९ हजार रुपयांची देणगी.

६) २०१४ मध्ये एअरटेल ब्रॉड बँड कनेक्शनकरता ७ लाख १९ हजार रुपयांची देणगी.

७) २०१५ मध्ये बायोगॅस प्रकल्पाकरिता ५७ लाख ६४ हजार रुपयांची देणगी.

८) २०१६ मध्ये साई आश्रम भक्त निवासासाठी ५८ लाख रुपये किंमतीचे ६ हजार ब्लँकेट्स, बेडशीट्स, उश्या आणि उशी कव्हर्स आदि साहित्य घेऊन दिले.

९)एप्रिल २०१६ मध्ये साईधर्मशाळेला ५८ लाख २० हजार रुपये किंमतीची ३६०० लॉकर्स असलेली ६०० कपाटे घेऊन दिली.

१०) जून–जुलै २०१६ मध्ये पाणीटंचाईच्या काळात ४ लाख ८२ हजार रुपयांची देणगी.

११) शताब्दी उत्सवात सर्व उत्सवांतील मोफत अन्नदान योजनेसाठी २६ लाख रुपयांची देणगी.

श्री. रमणी हे २००८ ते २०११ या काळात साईबाबा संस्थानच्या आय.टी. विभागाचे चेअरमन होते. या काळात त्यांनी हा विभाग अद्ययावत करण्यासाठी खूप मोलाचं मार्गदर्शन केलं.

रमणी यांनी केलेली ही मदत सर्वस्वी त्यांच्या स्वतःच्या मिळकतीतून केलेली आहे. २००४ मध्ये त्यांनी आपल्या कंपन्या विकल्या आणि त्यातील ८० टक्के रक्कम सामाजिक कामांसाठी किंवा गोरगरिबांच्या मदतीसाठी खर्च करण्याचा निर्णय घेतला आणि ते हा निर्णय कसोशीने पाळत आहेत. त्यांची पत्नी आणि कन्या याही त्यांच्या या साईभक्तीत समरसून गेल्या आहेत.

प्रसिध्दीचा किंचितही हव्यास नसलेल्या रमणी यांनी एकाही प्रकल्पाला स्वतःचं नाव दिलेलं नाही किंवा स्वतः दिलेल्या देणगीचा कुठे उल्लेखही केला नाही. 'साईंच्या प्रेरणेने हे सगळं घडतं आणि साईसमर्पणाच्या भावनेतूनच आपण ते करत असतो,' असं ते मानतात.

बाबा हे धर्मिक नव्हे, तर आध्यात्मिक गुरु आहेत. त्यांची भक्ती आणि पूजा यात फरक आहे. पूजा म्हणजे तात्पुरती आणि कोणत्यातरी उद्देशाने केलेली असते. पण, भक्ती म्हणजे बाबांना सर्वस्व समर्पण. एकदा तुम्ही आपलं सर्वस्व बाबांना अर्पण केलंत की मग तुम्ही बाबांचे होता आणि बाबाच तुमची सर्वार्थाने काळजी घ्यायला लागतात. बाबा आपल्या भक्ताला कधीही वाऱ्यावर सोडत नाहीत. त्यांच्या कृपेने भक्ताची प्रगती, भरभराट होतेच होते. एखाद्या भक्ताची तेवढी पात्रता नसेल तर बाबा त्याला आधी त्यासाठी पात्र बनवतात. भक्ताने केलेल्या मागण्यांपैकी काय चांगलं आणि काय वाईट हे बाबांना समजतं. त्यामुळे भक्ताची चुकीची मागणी बाबा कधीच पूर्ण करत नाहीत. अनेकदा एखाद्या प्रश्नाबाबत बाबा आपल्याला काही सांगत आहेत, असं भक्ताला जाणवतं. अर्थात् हा ज्याच्या त्याच्या अनुभूतीचा प्रश्न आहे, असं रमणी मानतात.


नोकरी सोडून स्वतःचा उद्योग सुरू करण्याची प्रेरणा बाबांनीच आपल्याला दिली, त्यांच्यामुळेच यश मिळालं. मिळालेली संपत्ती भक्तांच्या सेवेत समर्पित करण्याची प्रेरणा त्यांनीच दिली आणि तेच आज माझ्याकडून जनसेवेचं हे काम करवून घेत आहेत, अशी रमणींची श्रध्दा आहे.

■■■

# प्रभू आले मंदिरी

अंजली पर्वते

रावण वधानंतर प्रभू श्रीराम अयोध्येला परतले तेव्हा नागरिकांनी त्यांचं प्रचंड स्वागत केलं. श्रीरामाच्या या आगमनाचं व त्यावेळच्या अयोध्या नगरीचं वर्णन विविध रामायणात दिलं आहे. त्याची ही छोटीशी झलक.



रसिकहो, नुकतीच आपण दिवाळी साजर केली, दिवाळीपूर्वी काही दिवस संपादकांनी रामकथेवर एखादा लेख विशेषत: श्रीरामांच्या अयोध्येला परतण्याच्या प्रसंगावर आधारित काही लिहाल का? असं विचारलं आणि त्यांना होकार देताना मनात लेखाचं शीर्षकही सहज उमटलं.. 'प्रभू आले मंदिरी...' आपल्याला आठवत असेल तर पूर्वी आकाशवाणीवर एक गाणं नेहमी लागायचं, 'विजयपताका श्रीरामाची झळकते अंबरी, प्रभू आले मंदिरी' या गाण्यात रावणावर विजय मिळवून अयोध्येला परतणाऱ्या श्रीरामांचे आणि त्यांच्या परतण्याने आनंदित झालेल्या प्रजाजनांचं छान वर्णन आलं आहे, त्यातलेच शब्द मला आठवायचं कारण असं की श्रीरामांच्या रावणविजयाचा आणि अयोध्या प्रत्यागमनाचा काळ नेमका दसरा ते दिवाळी याच कालावधीतला होता. किंबहुना दसरा रावणवधाचा दिवस आणि दिवाळी हा अयोध्यावासियांनी श्रीरामांच्या आगमनाप्रीत्यर्थ साजरा केलेला आनंदोत्सव होता. म्हणूनच श्रीरामांच्या अयोध्येत परतण्याच्या घटनेवर लिहायचं तर 'प्रभू आले (निज) मंदिरी', असं म्हणावं, तेच उचित ठरेल, असं वाटलं.

**प्रत्यक्ष अयोध्येत आगमन**

देवांनाही बंदी बनवण्याचे सामर्थ्य असलेल्या, अहंकाराने उन्मत्त झालेल्या रावणाचा श्रीरामांनी वध केला. अयोध्येच्या रघुकुलाची प्रतिष्ठा असणाऱ्या सीतेला त्याच्या कैदेतून मुक्त केले आणि यशस्वी होऊन अयोध्येला परतण्यासाठी ते निघाले, वाटेत भरद्वाज ऋषींच्या आश्रमात मुक्काम करून त्यांनी हनुमंताला भरताला वार्ता देण्यास पुढे पाठवले, असे वर्णन रामायणात

श्रीरामांच्या अयोध्याप्रत्यागमनाची पार्श्वभूमी म्हणून आहे. प्रत्यक्षात हनुमंताकडून साद्यंत वार्ता ऐकल्यावर, श्रीरामांची अतुलनीय पराक्रमगाथा ऐकून भरत सद्‌गदित होतो. हर्षभरित होतो. त्याच्या तोंडी वाल्मीकींनी जो श्लोक घातला आहे 'कल्याणी बत गावेचं लौकिकी प्रतिभाति मोम्। एतिजीवन्नमानन्दो तरं वर्षशवादपि' शेकडो वर्षांनी का होईना माणसाला हवा तो आनंद प्राप्त होतोच. या अर्थाचा त्यामधून श्रीरामांच्या दुष्टांचे निर्दलन करून स्वगृही परतण्याचा आनंद भरताला किती प्रकर्षाने जाणवत होता, हे कळते. त्यानंतर भरताच्या आज्ञेनुसार शत्रुघ्न नंदिग्रामापासून अयोध्येपर्यंतचे सारे मार्ग समतल व स्वच्छ करून घेतो. सारे अमात्यगण उत्तम पोशाख व आभूषणे इ. धारण करून ....... हत्ती घोड्यावर स्वार होऊन नंदिग्रामाकडे कूच करतात. प्रजाजनही भरताचे अनुसरण करतात. पुष्पक विमानातून येताना रामाला थोडासा उशीर लागल्यावर भरत अस्वस्थ होऊन मारुतीने आपली फसवणूक तर नाही ना केली? अशी शंका घेतो. पण तेवढ्यात वानरादिकांच्या किलकाऱ्या ऐकू येतात व विमानातून येणारा राम प्रजाजनांना दिसतो तो शांत स्निग्ध चंद्रासारखा. सारेच दुरून अभिवादन करतात. भरताला मात्र आपला वीर बंधू मेरुपर्वताच्या शिखरावरून उगवणाऱ्या सूर्यदेवतेसारखा दिसतो व तो एखाद्या व्रतस्थ भाविकाने मोठ्या भक्तिभावाने त्या तेजासमोर नतमस्तक व्हावे तसा रामासमोर नतमस्तक होतो, असे वर्णन वाल्मिकी करतात. (ही दोन्ही वर्णने वाचताना माझ्या मनात दिवाळीत आपण लावत असलेल्या शांत तेजाने अंधार भेदून लक्ष वेधून घेणाऱ्या पणत्यांच उभ्या राहिल्या) रामाच्या व्यक्तिमत्त्वातील



शांत, स्निग्ध सुखद तेजस्वितेची ओळख यातून होते. पुढे राम विमानातून उतरताच राम-भरत भेट होते. राम पुढे भरताची राज्य स्वीकारण्याची विनंती मान्य केल्यावर श्रीराम सर्व गुरुजन व आप्तेष्ट यांच्यासह अयोध्येकडे जायला निघतात त्यावेळी आधीच मिळालेल्या राजाज्ञेनुसार आणि आपल्या आनंदाचं प्रतीक म्हणून नागरिकांनी सुवर्ण पुष्पांनी सजवलेली घरं, घराघरांवर लावलेल्या रंगीबेरंगी पताका, उभारलेले ध्वज, बांधलेली तोरणं श्रीरामांना पाहायला मिळतात. (आपण दिवाही लावतो, आकाश कंदील, करतो ती रोषणाई असाच तर आनंद व्यक्त करण्यासाठी असते.) त्यानंतर श्रीरामांनाही राजवस्त्रे परिधान करायला लावून, त्यांना विविध आभूषणांनी सजवून राज्याभिषेक केला जातो आणि मग भरत म्हणतो –

'यावदावर्तते चक्रं यावती च वसुन्धरा। तावत् त्वमिहहोकस्व स्वामित्वनुवर्तय ।।'

इथे एका अर्थी रामाच्या अयोध्या प्रस्थागमनाची सांगता होते.

**अन्य रामायणांतही वर्णन**

वाल्मिकी रामायणातला हा आनंदाचा प्रसंग अध्यात्म, भावार्थ अशा अन्य रामायणांतही आला आहे, अध्यात्मात तो जसाच्या तसा आढळतो. भावार्थ रामायण या रामायणात तो अधिक उत्कट (आनंदाचे) वर्णन करणारा आहे.

'हर्षाचेनि मदारोळे ।  
नगर वनिताश मंगल केले ।  
दधिमधडाक्षतादूवामेळे ।  
दीप प्रबळे ओवाळिती।'

असे वर्णन नाथमहाराज करता ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे.

**उपसंहार**

मला मात्र या सर्व रामायणांमधील या प्रसंगाची वर्णने वाचताना जाणवते ते हे की जनसामान्यांसाठी कवी योगेश्वर अभ्यंकरांनी या सर्व वर्णनांचे यथार्थ संकलन सुरेख समर्पक शब्दांत केले आहे, ते असे,

विजयपताका श्रीरामाची  
झळकते अंबरी प्रभू आले मंदिरी ।।  
गुलाल उधळून नगर रंगले  
भक्तजनांचे थवे नाचले  
रामभक्तीचा गंध दरवळे  
गुढ्या तोरणे घरोघरी ग घरोघरी ।।१।।  
आला राजा अयोध्येचा  
सडा शिंपला प्राजक्ताचा  
सनई गाते मंजुळ गाणी  
आरती ओवाळिती नारी ।।२।।  
श्रीरामाचा गरज होऊनी पावन त्रिभुवन झुकते चरणी  
भक्त रंगले गुणीगावनी भक्तियुगाची ललकारी ग ललकारी ।।३।।

– हे वर्णन वाचले की रामाच्या अयोध्या प्रत्यागमनाने अयोध्या वासियांनी कशा प्रकारे दिवाळी साजरी केली ते सहज डोळ्यांसमोर उभे राहते.

■■■

# काव्यसरिता

## ऐक तू साई देवा

(अनुष्टुभ छंद)

तूच माझा गजानन
तूच पांडुरंग माझा
तूच तारशील आता
कर तू उद्धार माझा

त्या कातर शांत वेळी
कणव येऊन माझी
नैराश्याच्या दाढेतून
बोट सावर तू माझी

अगणित वेळी मला
तारिले उदीने तुझ्या
प्रेमे शाल पांघरून
संरक्षिले तना माझ्या

परंतु मी काय केले
भरपाई कशी करू
केले काहीच नाही
उतराई कशी करू

संभ्रमात पडलो मी
माझाच वाटला हेवा
हेची दान देगा देवा
तुझा विसर न व्हावा

– शरदचंद्र पाटील, अलिबाग

## याचना


चित्त चंचल सदैव भिरभिर
वाटचालही सदैव अस्थिर
परंतु श्रद्धा मनात उत्कट
भक्तीवाटे जाते उमलत
सगुण साई श्री चरणांवर
कृतज्ञ मन हे असो समर्पित

साई ॐकार, विश्वसहारा
तेजसूर्य अन् शांतिचंद्र तू
ज्ञानदीपाची प्रेम ज्योत तू
हाती काम, मुखात नाम
हेच दान मम अंजुलीत
सद्‌गुरू साई, आज टाक तू

हे मधुमधुरा, परम उदारा
अणुरेणुत अन् कणाकणांत
भक्त हृदयी आहेसच तू
या नेत्रांना दिसावास तू
फक्त तूच तू, फक्त तूच तू

– आशा मेलग, पुणे

सद्‌गुरू शंकर महाराज हे अनेक भाविकांचे श्रद्धास्थान. पुण्यात असलेल्या शंकर महाराज मठात राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविकांची दर्शनासाठी गर्दी होत असते. सद्‌गुरू साईबाबांप्रमाणेच शंकर महाराजांच्या कृपेची अनुभूती आजही अनेकांना होत असते. त्यांचं अद्‌भुत चरित्र आणि लीला अनेकांना जीवनाची दिशा देणाऱ्या आहेत. शंकर महाराजांच्या प्रकटदिनानिमित्त विशेष लेख.



मुरलीधर धंबा

# श्री शंकर महाराज

श्री शंकर महाराजांची समाधी पुण्यातील धनकवडी येथे आहे. मुख्य रस्त्याला लागून थोड्याशाच अंतरावरील एकांतात असलेल्या महाराजांच्या मठात गेल्यावर मात्र आजूबाजूच्या वाहनांच्या वर्दळीची काहीच जाणीव होत नाही. मठाचा परिसर विस्तीर्ण आहे. कैक भाविक बसू शकतील एवढा मंदिरपरिसराचा आवाका आहे. महाराजांची समाधी फुलांनी सजलेली असते. समाधीवर महाराजांचा चांदीचा मुखवटा व पादुका असून समाधिमंदिराच्या गर्भागारात चारी बाजूंनी महाराजांचे विविध रूपांतील भावदर्शन घडविणाऱ्या छब्या आहेत. आतील धवल पांढऱ्या शुभ्र रंगाच्या विद्युत प्रकाशात गर्भागार खूपच सुंदर दिसते. गर्भागारात प्रवेश केल्यावर एक वेगळेच चैतन्य जाणवते. महाराजांच्या चरणपादुकांवर नतमस्तक होऊन विनम्रपणे दर्शन घेताना होणारा आनंद वर्णनातीत आहे.

श्री शंकर महाराजांचा जन्म पंढरपूरजवळील मंगळवेढ्याच्या उपासनी कुटुंबात सन १८०० साली झाला. ''मैं कैलास से आया हूँ।'' असे ते म्हणायचे. त्यांना शिवाचे वैराग्यसंपन्न अवतार समजले जाई. नाशिकमधील अंतापूर नावाच्या खेड्यातील शिवभक्त चिमणाजींना अपत्य नव्हते. एकदा त्यांना दृष्टांत झाला, ''तू रानात जा; तुला तिथे एक बालक मिळेल.'' त्यानुसार चिमणाजी तेथे गेल्यावर त्यांना

खरोखरच एक दोन वर्षांचे बाळ सापडले. शिवाच्या कृपेने सापडले, म्हणून या बालकाचे नाव त्यांनी 'शंकर' ठेवले. काही वर्षे तिथे राहिल्यानंतर ''तुम्हाला पुत्रप्राप्ती होईल,'' असा चिमणाजी दांपत्यास आशीर्वाद देऊन शंकर घराबाहेर पडला. घरातून निघून गेल्यावर ते वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या नावांनी वावरत. मोठे डोळे, अजाणबाहू व गुडघे वर करून बसण्याची त्यांची नेहमीची पद्धत होती. सफेद धोती, सफेद शर्ट हा नित्याचा पोषाख, खूप वाढलेले केस, दाढीमिशी, अतिशय मोठे भेदक डोळे, असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. बोलणे-वागणे लहान मुलांप्रमाणे होते, तरी त्यांचे तेज व योगसामर्थ्य मात्र त्यांच्या चेहऱ्यावर विलसत असे. गावंढळ, अज्ञानी वाटणारे व लहान मुलांप्रमाणे वागणारे महाराज जेव्हा बोलू लागत तेव्हा चांगले शिकलेल्यांचीही तोंडे बंद होत. श्री स्वामी समर्थांना ते आपले गुरु मानीत. श्री क्षेत्र औदुंबर, श्री शैल्यम्, अक्कलकोट, त्र्यंबकेश्वर सारख्या वेगवेगळ्या क्षेत्री त्यांची भ्रमंती असायची. ते योगीराज, सिद्धसंपन्न असे अलौकिक अवलिया होते; पण नावलौकिकासाठी त्यांनी याचा कधीच वापर केला नाही. सर्वांशी समभावनेने वागत. ते कुठे शिकले याची माहिती उपलब्ध नाही. ते अस्खलित इंग्रजीत बोलत. त्यांनी मोठमोठी व्याख्याने, प्रवचने दिली नाहीत. साधे आचरण ठेवा, माता-पित्याची सेवा करा, कुलदेवतेची आराधना करा, असा साधासोपा उपदेश ते करीत.

लहानपणी ते खट्याळ व खोडकर होते. एकदा हरणाच्या पिल्लाचा पाठलाग करीत ते घोर अरण्यात गेले. त्या ठिकाणी शंकराचे जीर्ण मंदिर होते. हरणाचे पिल्लू आश्रयासाठी देवळात लपले. पिल्लाला बाण मारणार, एवढ्यात एक दिगंबर साधू त्यांच्यासमोर उभा राहिला. पिल्लाला मारू नकोस म्हणत त्याने शंकराच्या मस्तकावर हात ठेवला. त्या स्पर्शाने शंकर अगदी भारावून गेला. तो साधू दुसरा-तिसरा कोणी नसून, ते श्री स्वामी समर्थ होते, असे ते सांगत. शंकर महाराज म्हणत - ''मीपणा, माझे, मी एवढे ग्रंथ वाचले, इतकी उपासना करतो, एवढा जप केला, माझे अमुक एवढे शिष्य आहेत, हा परमार्थाला आड येणारा प्रपंचातील अहंकार माणसाने सोडून द्यायला हवा.'' स्वत:बद्दल ते म्हणत - ''मला काही कमी नाही; कारण मला कमावण्यासारखे काही नाही आणि माझ्याजवळ गमावण्यासारखेही काही नाही.'' या त्यांच्या शब्दांतून त्यांचे पारमार्थिक वैराग्य दिसून येते. श्री स्वामी समर्थांना ते गुरु मानीत असल्याने आपल्या भक्तांना ते स्वामीसेवेचा जप करावयास सांगत. नारायण राजहंस (बालगंधर्व), प्र. के अत्रे, सोलापूरचे शुभराय मठ, त्र्यंबकेश्वरचे रामचंद्र अकोलकर, अहमदनगरचे डॉ. धनेश्वर हे त्यांचे काही प्रसिद्ध भक्तगण! ते म्हणत - ''माझा जातधर्म, पंथ शोधू नका. बाह्यरूपावरून तर्कवितर्कही करू नका. सर्वांशी प्रेमाने वागा. सिद्धीचा चमत्कार करणारे कर्म बदलत नसतात.'' त्यांनी भक्तांचा गर्व हरण करण्यासाठी वा परीक्षा घेण्यासाठी चमत्कार केले; पण चमत्काराच्या मागे लागू नका, असेही ते म्हणत. ''श्री स्वामी समर्थ'' हा माझ्या गुरुचा जप आहे. तुम्ही त्यांचे नाव घेतले, तरी ते मला पोहोचते - असेही ते सांगत. स्वामी समर्थांना ते 'मालक' म्हणत. ''जो ख़ुद को जानता है, वो ही मुझे पहचानता है'' हे त्यांचे वचन आहे.

परमार्थातील साधनेबाबत ते म्हणत - आईचे बालकावर प्रेम, तसे प्रेम निर्माण होणे म्हणजे साधना! आई म्हणजे बालकावर प्रेम करणारी व्यक्ती, तर माउली म्हणजे विश्वावर प्रेम करणारी, चराचरावर प्रेम करणारी व्यक्ती! ज्ञानेश्वरांना म्हणूनच 'माउली' म्हणतात. आई बनणे ही साधना, तर माउली होणे ही सिद्धी! जीवन नदीप्रवाहाप्रमाणे वाहत असावे. प्रवाहात आलेले वाळके पानही प्रवाहाबरोबर शांतपणे वाहत जाते, आपलेही तद्‌वतच असावे. अहंकार गेला की आपण वाळके पान होतो, मग त्या भगवंताने कुठेही न्यावे.

पुण्याच्या अप्पा बळवंत (मेहंदळे) यांच्या घराण्यातील ताईसाहेब या आपल्या वाड्यातील दिवाणखान्यात वेदांत, योगशास्त्रावर सुंदर प्रवचन करीत. एकदा शंकर महाराजांनी ताईसाहेब मेहेंदळे यांच्या गळ्याला स्पर्श केला आणि आज्ञा केली - आता ज्ञानेश्वरी सांग... आणि ताई ज्ञानेश्वरीची काव्यमयता, शास्त्रीयता, वैचारिक सुसंगती सहजपणे उलगडत गेल्या. मेहंदळेदांपत्याची त्यांच्यावर अपार श्रद्धा होती. पुण्याच्याच डेक्कन कॉलेजचे प्रोफेसर भालचंद्र देवांना शंकर महाराज प्रसंगी वयोवृद्ध दिसत, तर कधी तरणाबांड जवान! तेव्हा उत्सुकतेने त्यांनी महाराजांना त्यांचे वय विचारले, महाराजांनी त्यांचे वय दीडशे वर्षे असून, ते शनिवारवाड्यात पेशव्यांच्या पंगतीत बसल्याचे सांगितले. म्हणजेच समाधीपर्यंत त्यांचे वय दीडशेपेक्षाही अधिक होते, हे सिद्ध होते. नगरला एका दत्तभक्ताकडे महाराज उतरले होते. त्या दत्तभक्ताच्या दहा वर्षांच्या मुलाला सोबत घेऊन काही भक्तमंडळींसह महाराज गिरनारला निघाले. गिरनारच्या दहा हजार पायऱ्या चढायला मुलगा तयार होईना. महाराजांनी त्याला खांद्यावर घेतले आणि अवघ्या अर्ध्या तासात गुरुशिखरावर पोहोचले.

१३ हा महाराजांचा प्रिय आकडा! ते म्हणत, ''सबकुछ तेरा, कुछ नहीं मेरा।'' शिष्यांना ते सांगत, ''हे जीवन व तुझे सारे ऋणानुबंध तुझेच आहेत. तुझ्या मागील जन्माचे कर्मभोग तुलाच भोगायचे आहेत. त्यातून मोकळा झाल्याशिवाय ईश्वरप्राप्ती नाही.'' त्यांच्या अनेक शिष्यांची जन्मतारीख १३ आहे. त्यांचे परमभक्त अत्रेंचा जन्म १३ ऑगस्ट १८९८, तर मृत्यू १३ जून १९६९. पाथर्डीच्या माधवनाथबाबांना समाधीनंतर ५४ वर्षांनी पावागड डोंगर चढताना महाराज भेटले. त्यांनी माधवनाथांना पाच हॉटेलांत चहा पाजला. प्रत्येक वेळी हॉटेलचे बील १३ रुपयेच झाले.

पुण्याच्या लाकडी पुलावर एक गृहस्थ रोज महाराजांसोबत गप्पा मारीत असायचे. दोघांची चांगली गट्टी जमली. एकदा त्या गृहस्थांनी महाराजांना त्यांचे नाव व आपण कोठे राहता म्हणून विचारले. त्यावर महाराजांनी आपण धनकवडीत राहत असल्याचे सांगितले. त्यानंतर दोन दिवस ते तेथे आले नाहीत म्हणून ते गृहस्थ धनकवडीमठात चौकशीसाठी गेले असता, त्यांना कळले की, महाराजांनी तर आठ वर्षांपूर्वीच समाधी घेतली आहे. नवले नावाच्या शिष्याने आपणास विष्णूपद दाखवा म्हणून महाराजांना विनंती केली. तेव्हा महाराज नदीत उभे राहून नवलेंना म्हणाले, ''आता विष्णूपद बघ!'' नवलेंना तेथे विष्णूपद दिसले; मात्र ते हात सरकवत विष्णूपद पाहू लागले, तर विष्णूचा मुकुट आकाशापर्यंत पोहोचला होता... असेही होते महाराजांचे विराट रूप! नाशिकला काबुलीबाबांकडे महाराज असताना त्यांच्या दर्शनासाठी नागपूरहून ताजुद्दिनबाबा आले होते. शंकर महाराज झोपत, तेव्हा ते पहारा देत, हे काही मुस्लिमांना खटकत असे.



ते महाराजांना त्रास द्यायला येत, तेव्हा त्यांना ताजुद्दिनबाबांच्या जागी हनुमान दिसे आणि ते पळून जात. श्री शंकर महाराजांना साक्षात् हनुमानस्वारी पहारा देई... यावरून महाराजांचा अधिकार कळून येतो. महाराजांनी आपल्या भक्तांना असे कित्येक दृष्टांत दिले आहेत. महाराज म्हणत – देवाला प्रसन्न करण्यापेक्षा तुमच्यातील देवाला प्रगट करा. त्यासाठी तुमच्यातील षड्रिपु दूर करा. आपल्यातील चांगल्या शक्तींचा वापर आपले दुर्गुण दूर करण्यासाठी वापरा आणि चांगले आचरण करता येईल एवढा तरी किमान ग्रंथाभ्यास करा, माता-पिता, कुलदेवतेची आराधना चुकवू नका.

एकदा सकाळी उठल्यावर शंकर महाराजांना उदासीन वाटू लागले. साधनेत वा ज्ञानेश्वरीवाचनात मन लागेना. असे का होतेय, त्यांना कळेना. त्यांना सारखी स्वामींची आठवण येऊ लागली. जीवाला हुरहूर लागून राहिली. स्वामींच्या भेटीसाठी जीव व्याकूळ होऊ लागला. स्वामींना साकडे घातले, ''स्वामी, असे का होतेय; माझे काही चुकले का?'' ''नाही बेटा.'' उत्तर आल्यावर स्वामी वटवृक्षाखाली पद्मासनात बसलेले दिसले. मुखावर कोटी सूर्यांचे तेज, नजर प्रेमाने ओथंबलेली! शंकर महाराज पुढे सरसावले, नतमस्तक झाले. स्वामींनी त्यांना जवळ ओढले, हृदयाशी घट्ट धरले. महाराजांचे अंगांग कंपित पावले. स्वामींच्या डोळ्यांतून तेज:पुंज ज्योत निघून शंकर महाराजांच्या हृदयात स्थिर झाली. महाराज समजले, देहाचं सगुण सरलं, देहाचे अनुबंध तुटले. ते कळवळून म्हणाले, ''स्वामी, मला पोरकं करून कसं जाऊ शकता?'' त्यांना उत्तर आले, ''जो जो अनन्यभावे आमची भक्ती करतो, नामस्मरण करतो, त्याचा योगक्षेम आम्ही चालवितो. आम्ही आहोत तुझा सांभाळ करायला. वडाचे मूळ धरून रहा; आम्ही कुठेही गेलेलो नाही, तुझ्यामध्येच आहोत.'' ''हम गया नहीं, जिंदा है।'' तो दिवस होता ३० एप्रिल १८७८, चैत्र, वद्य त्रयोदशी! आपला वारसा आपल्या लाडक्या शिष्याकडे, शंकर महाराजांकडे देऊन स्वामी समर्थ महाराज वटवृक्षाखाली निजानंदी निमग्न झाले. शंकर महाराजांनीही आपल्या समाधिस्थळाची जागा आधीच ठरवून ठेवली होती.

वैशाख, शुद्ध अष्टमी, शके १८६९, सन १९४७, सोमवार या दिवशी शंकर महाराज समाधिस्थ झाले.

श्री. भगवंत वासुदेव अघोरशास्त्री रचित 'श्री शंकर गीता' या महाराजांवरील पोथीत त्यांचे समग्र जीवनचरित्र साकारलेले आहे.

■■■

समर्थचरणी लीन झालेल्या मारुतीबुवा रामदासी यांचं नुकतंच निधन झालं. सारं आयुष्य त्यांनी समर्थ सेवेत झोकून दिलं होतं. ज्ञानोपासना, बलोपासना आणि चारित्र्यसंवर्धन हे स्वामी रामदासांचे मुख्य गुण तरुणांच्या अंगी बाणावेत यासाठी त्यांनी अखंड आणि अथक प्रयत्न केले.



मुकुंद फडके

# समर्थभक्त मारुतीबुवा रामदासी

सदासर्वकाळ रामनामात आणि समर्थभक्तीत रमणारे आणि परमपूज्य श्रीधरस्वामी यांचा अनुग्रह प्राप्त झालेले थोर समर्थभक्त मारुतीबुवा रामदासी यांचे नुकतेच निधन झाले. भक्ती आणि सेवा याचे मूर्तिमंत उदाहरण असलेल्या मारुतीबुवांना विनम्र आदरांजली.

सज्जनगडावर दीर्घकाळ वास्तव्य करून तेथील भूमी अधीकच पावन करणारे संतपुरुष म्हणजे परमपूज्य श्रीधरस्वामी. पुण्याहून सज्जनगडावर साधनेसाठी जाण्याचा निर्णय घेताना त्यांनी काही प्रतिज्ञा केल्या होत्या, त्यामध्ये पुढील निश्चयाचा समावेश होता–अस्खलित ब्रह्मचर्य पाळीन. द्रव्याला स्पर्श करणार नाही. कोणी दिल्यास त्याचा विनियोग परोपकारार्थ करीन. कुठेच मठपती होऊन रहाणार नाही. कमीत कमी गरजा ठेवीन. स्त्री–पुरुषांना समदृष्टीने बोध करीन. अखिल स्त्री–समाज मातेप्रमाणे मानीन. धर्माला आलेली ग्लानी घालवून जग सुखी करीन. देह लोककल्याणार्थ झिजवीन. हे सर्व करण्यासाठी मी हा देह भगवंताला अर्पण केला आहे.

आपल्या अनुयायांनी गांभीर्याने याच उपदेशाचे पालन करावे असे श्रीधरस्वामींना वाटत होते, त्यांची ही अपेक्षा शतशः पूर्ण करणारे अनुयायी म्हणून समर्थभक्त मारुतीबुवा रामदासी यांचा उल्लेख करावा लागेल.



श्रीधरस्वामींचा अनुग्रह आणि सहवास लाभलेल्या मारुतीबुवांनी मोठ्या निष्ठेने आणि गांभीर्याने, पण कोणताही बडेजाव न करता आपल्या गुरूंच्या मार्गावर पाऊल ठेवले होते आणि नंतरची वाटचालही त्याच निग्रहाने केली होती, त्यामुळेच त्यांच्या निधनानंतर समर्थभक्तांमध्ये मोठी आध्यात्मिक पोकळी निर्माण झाली. सर्व प्रकारच्या विकारांपासून दूर राहून आध्यात्मिक मार्गावर कसे चालत राहायचे याचे आदर्श उदाहरण मारुतीबुवांनी घालून दिले होते.

मारुतीबुवा यांचा जन्म १९३६ साली कोल्हापूर जिल्ह्यातील 'बुवाचे वठार' या छोट्याशा गावी झाला होता. घरात हनुमानभक्ती असल्याने त्यांचे नाव मारुती असे ठेवण्यात आले लहानपणापासूनच त्यांना भक्तिमार्गाची ओढ होती. त्यामुळेच ते १४-१५ वर्षांचे असतांना घर सोडून श्री क्षेत्र गाणगापूर येथे सेवा व तप करण्यास गेले. तेथे त्यांची भेट थोर साधक श्री लक्ष्मी नारायण यांच्याशी झाली. काही दिवसानंतर, म्हणजे १९५०-५१ च्या सुमारास ते दोघे श्रीक्षेत्र सज्जनगडला येऊन पोहोचले व तेथे त्यांना श्री स्वामींचे दर्शन झाले व अनुग्रहही प्राप्त झाला. त्या नंतर श्री मारुतीबुवांनी कधीही सज्जनगड सोडला नाही. समर्थ रामदासस्वामींच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी स्थापन झालेल्या समर्थ सेवा मंडळाचे काम वाढवण्यात त्यांचा मोठा पुढाकार आणि सहभाग होता. गेल्या ३३ वर्षांपासून श्री समर्थ सेवा मंडळाचे प्रमुख कार्यवाह म्हणून जबाबदारी ते यशस्वीपणे पार पडत होते.

श्रीसमर्थ पादुका प्रचार दौरा महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरही अनेकांस परिचित आहे. या उपक्रमातही मारुतीबुवांचे मोठे योगदान होते. अशा प्रकारच्या प्रचारदौऱ्याची उदात्त कल्पना इ. स. १९५० साली श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड या संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष स. भ. बाबुराव वैद्य यांना सुचली. लाखोंच्या संख्येत असलेल्या भाविकांना त्या काळात सज्जनगडावर येणे व वास्तव्य करणे कठीण होते. त्यामुळे आपणच भाविकांजवळ जाऊन त्यांना समर्थ पादुकांच्या दर्शनाचा लाभ घडवावा आणि कीर्तन, प्रवचन, भिक्षा फेरी इत्यादी माध्यमांतून लोकांना समर्थांची व त्यांच्या तत्त्वज्ञानाची ओळख व्हावी ह्या लोककल्याणकारी हेतूने पहिला श्रीसमर्थ पादुका प्रचार दौरा इ. स. १९५० साली बदरीना येथे नेण्यात आला. वाटेत पुणे, मुंबई येथे झालेला समर्थ पादुकांचा सत्कार पाहून जनतेत समर्थांबद्दल असलेल्या श्रद्धेचा प्रत्यय आला. हा दौरा प्रचंड यशस्वी झाला. त्यावेळेपासून आजपर्यंत प्रतिवर्षी हा दौरा अत्यंत सूत्रबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात येतो. सन १९५० ते १९७८ पर्यंत श्री समर्थ सेवा मंडळाचे तत्कालीन कार्यवाह स. भ. दिनकरबुवा रामदासी यांनी इतर अनेक रामदासी सहकाऱ्यांसह पादुका प्रचार दौऱ्याची धुरा सांभाळली. त्यानंतर इ. स. १९७९ पासून मारुतीबुवा रामदासी यांनी ही परंपरा इ. स. २०१० पर्यंत यशस्वीपणे चालवली. मारुतीबुवांनी अनेक वेगळे प्रयोग केले. हा दौरा परदेशात नेण्याची कल्पना त्यांचीच. इ. स. २००० पासून प्रतिवर्षी श्रीसमर्थ पादुका सिंगापूर - मलेशिया यांसारख्या परदेशांत नेण्याची मुहूर्तमेढ रोवण्याचे श्रेय स. भ. मारुतीबुवा रामदासी यांनाच आहे. संपूर्ण महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, तामिळनाडू, गोवा यासारख्या अनेक राज्यांत पादुकांचा यशस्वीपणे दौरा आयोजित करण्याचे कार्य स. भ. मारुतीबुवा रामदासी यांनी

उत्स्फूर्तपणे केले. मारुतीबुवांमधील व्यवस्थापन कौशल्य या दौऱ्यात दिसून येई. कोणत्याही समस्येवर ते मार्ग काढीत आणि संपूर्ण दौऱ्याचे श्रेय निस्पृहपणे कार्य करणारे गडावरील रामदासी, कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य करणारे कीर्तनकार यांना देत.

मधल्या काळात सज्जनगडावरही दोन गट निर्माण झाले आणि एका नवीन संस्थेचाही उदय झाला. या दोन गटामधील वाद विकोपाला गेले होते, पण मारुतीबुवांनी त्या कोणत्याच वादात न पडता समर्थ सेवा मंडळाचे काम निष्ठेने चालू ठेवले होते. सज्जनगडासारख्या पवित्र ठिकाणी अशा प्रकारचे वादविवाद चुकीचे आहेत, अशी खंत मात्र ते खाजगी भेटीत बोलून दाखवत. या वादांमुळे भाविकांच्या सेवेवर आणि सुविधांवर परिणाम होऊ नये, एवढीच त्यांची अपेक्षा होती. दासनवमीच्या उत्सवाचे उत्कृष्ट नियोजन मारुतीबुवा करीत. १० दिवसात हजारो भाविक सज्जनगडाला भेट देत. त्यापैकी कोणाचीही गैरसोय होऊ नये, यासाठी ते कायम दक्ष असत.

सज्जनगडावर सतत रामाच्या आणि रामनामाच्या सहवासात असल्याने मारुतीबुवांमधील एक आध्यात्मिक लेखक आणि चिंतकही विकसित झाला. त्यांनी श्रीमद् दासबोध, मनाचे श्लोक, आत्माराम या विषयांवर खूप लिखाण केलेले आहे. त्यांनी श्रीधरस्वामींचे चरित्रही लिहिलेले आहे. सार्थ आत्माराम, मनोबोधाचा अभ्यास, दासबोध चिंतनिका, दासबोधातील रहस्य, आत्मारामातील रहस्य हे त्यांचे ग्रंथ साधकांसाठी मार्गदर्शक आहेत.

मुखी सतत रामनामाचा जप असलेले मारुतीबुवा संपूर्णपणे राममय झाले होते. त्यांच्या रामभक्तीचे आणि नामभक्तीचे वर्णन करण्यासाठी पुढील छोटीशी कथाच योग्य ठरेल.

एकदा रामाने हनुमंताला विचारले, हनुमंता, माझ्या रामबाणापेक्षा जास्त प्रभावी शस्त्र तू कुठे पाहिले आहेस काय?

याचे उत्तर नाही, असेच अपेक्षित होते. पण, हनुमंत म्हणाला, हो पाहिले आहे.

या उत्तरावर प्रभूंनी आश्चर्य दाखविले. ते म्हणाले, माझा रामबाण ज्याला मारायचा, त्याचा कधीही न चुकता बरोबर वेध घेऊन माझ्या भात्यात परत येतो. शिवाय, तो मारलेल्याला मुक्तीपण देतो. यापेक्षा दुसरं मोठं प्रभावी शस्त्र कोणतं असणार?

त्यावर हनुमंत म्हणाला, यापेक्षा मोठं शस्त्र मी भरताकडून घेतलं आहे. रामबाणापेक्षा प्रभावी असं ते शस्त्र म्हणजे 'नामबाण'! रामबाण हा मारून मुक्ती देतो, पण नामबाण हा जिवंतपणीच मुक्ती देतो. शिवाय, तो कोणतीही पीडा निर्माण करत नाही.

मारुतीबुवांनी अखेरच्या श्वासापर्यंत हा नामबाण आपल्या हृदयात जपला होता. मारुतीबुवांच्या रूपातील या साध्यासुध्या, पण आध्यात्मिक मार्गावर पोहोचलेल्या सत्पुरुषाला विनम्र आदरांजली.

■■■

## साईलीला - नवे रूप, नवे उपक्रम

**'साईलीला'चा हा बदललेल्या रूपातील अंक तुम्हाला नक्कीच आवडेल. 'साईलीला'ची परंपरा सांभाळत हा अंक अधिक आकर्षक, देखणा आणि कालानुवर्ती करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. दर्जेदार मजकुराबरोबरच नेत्रसुखद मांडणी हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे. हा अंक अधिक परिपूर्ण होण्यासाठी आपला सहभाग केवळ आवश्यकच नव्हे, तर अनिवार्य आहे. या अंकासाठी आपल्या लेखनसहकार्याचे नेहमीच स्वागत होईल. अंकाच्या लौकिकाला साजेसे, वैचारिक, चिंतनशील लिखाण आम्हांला हवे आहे. काव्यातून आपल्या भावना मांडू इच्छिणाऱ्या वाचकांसाठी 'काव्यसरिता' हे नवे सदर आम्ही सुरू केले आहे. वाचकांसाठी 'साई प्रश्नमंजुषा' हे एक अभिनव सदर आम्ही सुरू करत आहोत.**

**कोणताही अंक हा वाचकांबरोबरचा संवाद असतो. तुमच्या सहभागाशिवाय तो पूर्ण होणार नाही. म्हणून या अंकासाठी आपण वेळोवेळी लिखाण करावे, ही विनंती आहे. आपला लेख / कविता / अनुभव किंवा प्रतिक्रिया 'साईलीला'कडे आवश्य पाठवा. आम्ही त्यांना योग्य प्रसिद्धी देऊ.**

**संपर्क पत्ता : 'साईनिकेतन', ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४.**

**दूरध्वनी : (०२२) २४१६६५५६, फॅक्स : (०२२) २४१५०७९. ई-मेल : saidadar@sai.org.in**

**भगवान दातार, ई-मेल : editor.saileela@gmail.com**

**- कार्यकारी संपादक**

# साई चित्रानुभूती

**माउली–मंदिराबाहेरची...**

पंढरपूर येथील विठ्ठलमंदिराच्या नामदेव पायरीजवळ विठुमाउलीच्या दर्शनासाठी आतुर झालेल्या माउलीचं दर्शन.

**छाया – शैलेश साठे, पुणे**



कोणत्याही मंदिरपरिसरात आपणास मानवतेची अशी काही दृश्यं दिसतात. आपल्या कॅमेऱ्याने टिपलेली अशी छायाचित्रे आपण 'साईलीला'साठी जरूर पाठवावीत. फक्त सोबत आपलं नाव, गाव, आणि मंदिराचा उल्लेख असावा.

**आपलं छायाचित्र पुढील ई–मेलवर पाठवा.**

**editor.saileela@gmail.com**

कला साधना

सुनील देशपांडे





# संगीत हे अध्यात्मच!

संगीतावर प्रेम करणाऱ्या व्यक्तीला – विशेषत: मराठी संगीतरसिकांना– पंडित अजित कडकडे या नावाची वेगळी ओळख करून देण्याची आवश्यकता नाही. एके काळी त्यांनी गाजवलेल्या शास्त्रीय संगीताच्या मैफिली, 'सजल नयन नित धार बरसती' यासारखी भावगीतं, 'मर्मबंधातली ठेव ही', 'विलोपले मधुमीलनात या', 'शतजन्म शोधिताना' यासारखी नाट्यगीतं अशा विविधांगी संगीताकृतींमधून पंडित अजित कडकडेपरिचित आहेत. गोव्यात जन्मलेल्या अजित कडकडे यांनी महाराष्ट्र ही कर्मभूमी मानली आणि गोव्याशी असलेली नाळही कायम राखली. गेल्या काही वर्षांत त्यांनी 'भक्तिगीत गायक' अशी स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध संतमहात्मे आणि त्यांच्या वास्तव्यानं पुनीत झालेली तीर्थक्षेत्रे यांची महती गाणारी कडकडे यांची शेकडो गीतं घराघरात पोहोचली आहेत. शिर्डीवर तर त्यांची पूर्वीपासूनच श्रद्धा आहे. साईबाबांच्या चरणी त्यांनी अनेक वेळा संगीतसेवा सादर केली आहे. संगीत हे ईश्वरापर्यंत पोहोचण्याचं माध्यम असल्याची त्यांची श्रद्धा आहे.

साईबाबांची पहिली आठवण कोणती हे सांगताना अजित कडकडे म्हणतात, ''संगीत क्षेत्रात जेव्हा मी कुणीही नव्हतो तेव्हापासून मी साईबाबांचा भक्त आहे. मी भक्त कसा बनलो ते आता सांगता येणार नाही. मला केवळ एवढंच आठवतं की गोव्याहून मुंबईला आलो तेव्हा माझ्यापाशी लाल कफनी परिधान

केलेल्या साईबाबांचा तळहाताएवढा एक फोटो होता. तो फोटो माझ्यापाशी कसा आला, कुणी दिला हे आता आठवत नाही. पण दररोज सकाळी शुचिर्भूत झाल्यानंतर त्या फोटोसमोर एक उदबत्ती लावून बाबांचं स्मरण करणं एवढीच माझी पूजाअर्चा होती, हे नक्की आठवतं. बाकी जप-तप, उपासना काही नाही, पण तेवढं मात्र नित्यनेमानं करीत असे, हीच माझी साईबाबांविषयी पहिली आठवण. शिर्डी आणि साईबाबा यांच्याशी तेव्हापासून नातं आहे. पुढे मग नवोदित गायक होतो तेव्हा आणि कलावंत म्हणून प्रसिद्ध झालो तेव्हाही मी नित्यनेमानं शिर्डीला जात राहिलो, साईचरणी सेवा रुजू करीत राहिलो. एके काळी मी शिर्डीत खूप गायलो आहे. तो अनुभव माझ्यासाठी खूप मोलाचा आहे. आज पूर्वीप्रमाणे शिर्डीला जाणं होत नाही, पण एक निश्चित की जिथे जिथे मी गातो तिथे तिथे बाबांची उपस्थिती असते. बाबांना भेटण्यासाठी शिर्डीलाच जायला हवं असं नाही. बाबा सर्वव्यापी आहेत. जगाच्या पाठीवर कुठेही असलो तरी त्यांचा हात माझ्या शिरावर आहे, ही भावना फार महत्त्वाची आहे. केवळ बाबाच नव्हे, ज्यांच्यावर माझी अपार श्रद्धा आहे ते अक्कलकोट स्वामी, शेगावचे गजानन महाराज यांच्याविषयीही माझी हीच भावना आहे.''

संगीत क्षेत्रात आजवर जे काही मिळवलं त्यामागे आपल्या गुरूंचा आशीर्वाद फार मोठा असल्याची अजित कडकडे यांची भावना आहे. आपले गुरू स्व. पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्याविषयी त्यांच्या मनात अपार श्रद्धा असल्याचा प्रत्यय त्यांच्याशी बोलताना येतो. अभिषेकी बुवांसंबंधीच्या आठवणी सांगताना ते म्हणतात, ''माझ्या वयाच्या अठराव्या वर्षी मी जेव्हा बुवांकडे शिकायला गेलो तेव्हा मला गाण्यातलं काही म्हणजे काही येत नव्हतं. तेदेखील शिकविण्याची मुळीच घाई करीत नसत. दोन वर्षे त्यांनी मला साधा 'सा'सुद्धा शिकवला नाही. मी बुवांकडे नुसता बसून असे. ते काय गातात, इतरांना काय शिकवतात याचं केवळ निरीक्षण करत असे. त्यांची छोटीमोठी कामं करत असे. दोन वर्षांनंतर, वयाच्या विसाव्या वर्षी माझं त्यांच्याकडे शिक्षण सुरू झालं.''

तुम्हाला शिकवताना पंडित अभिषेकी यांची पहिली प्रतिक्रिया काय होती, या प्रश्नावर कडकडे म्हणाले, ''आमच्या अभिषेकी बुवांची नजर एवढी तीक्ष्ण होती की एखादा शिष्य गायला बसला की त्यांना कळत असे, हा शिष्य 'संगीत शिकवणारा' होणार की 'गाणारा' कलाकार होणार! अमुक एक शिष्य मैफिली गाजवणार नाही, पण संगीतात विद्वान होईल, किंवा एखादा शिष्य फार विद्वान नाही झाला तरी कलाकार म्हणून प्रसिद्ध होईल, हे त्यांना अचूक कळायचं. माझ्याबाबत त्यांना तो विश्वास होता, म्हणूनच त्यांनी मला विसाव्या वर्षी शिकवायला सुरुवात केली. पाच वर्षे त्यांच्याकडे शिक्षण घेतल्यानंतर ते मला म्हणाले, 'आता तू छोट्या-छोट्या कार्यक्रमांतून गात जा. जिथं जिथं संधी मिळेल तिथं गात रहायचं. मानधन किती मिळेल याचा विचार करायचा नाही. आपल्याला या छोट्या मैफिलींतून आनंद मिळतो, हे ध्यानात ठेवायचं. अशा छोट्या-छोट्या कार्यक्रमांतूनच पुढे काहीतरी मोठं निर्माण होत असतं, हे ध्यानात ठेव.'...''

आरंभीच्या काळात शास्त्रीय संगीताबरोबरच भावगीत, भक्तिगीत आणि नाट्यगीत अशा सर्व प्रकारांवर अजित कडकडे यांनी आपला ठसा उमटवला. तथापि पुढे त्यांचा भक्तिगीत गायनाकडे अधिक ओढा राहिला. किंबहुना आज त्यांची ओळख मुख्यत्वे भक्तिगीत गायक अशी आहे. यामागची कारणमीमांसा करताना ते म्हणतात, ''तुम्हाला सांगितलं तर नवल वाटेल, सुरुवातीच्या काळात माझा भक्तिगीतांकडे ओढा नव्हता. पं. अभिषेकी बुवांकडचं माझं शिक्षण आणि त्यांनी अनुमती दिल्यानंतरची पहिली पाच-सहा वर्षे, या काळात मी केलेले कार्यक्रम आज आठवत गेलो, तर लक्षात येतं की त्या कार्यक्रमांत मी आरंभी शास्त्रीय गायन, नंतर एखादं भावगीत आणि नाट्यगीत गायचो. भजन किंवा भक्तिगीतं मी सहसा गात नसे. कधीकधी श्रोत्यांच्या आग्रहाखातर एखादं भक्तिगीत, तेही अनिच्छेनं मी गात असे. पण अधिकाधिक नाट्यगीतं गाण्याकडे माझा कल होता. पण ते मागे पडून भक्तिगीतांकडे माझा ओढा कसा वाढला, हे मलाही कळलं नाही. आपोआपच ते घडत गेलं. कदाचित संतांच्या रचनांची ती ताकद असेल. साईबाबा, अक्कलकोट स्वामी यांच्यावरील भक्तिरचना गायला लागल्यानंतर मला त्यातली शक्ती प्रत्ययाला आली. अपार भक्तीनं मी भारला गेलो. भक्तीची ही भावना इतरांपर्यंत पोहोचवावी, अशी तीव्र इच्छा माझ्या मनात निर्माण होत गेली आणि पाहता पाहता त्या प्रवाहात मी ओढला गेलो. संतांच्या रचना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठीच परमेश्वरानं माझी निवड केली असावी, असं मला वाटू लागलं. त्यानंतर भक्तिगीतांचा असा काही लळा लागला की मी संतांची, देवस्थानांची महती गाणारी गाणीच मी गात राहिलो.''

अजित कडकडे यांच्या उत्कर्षाचा काळ 'कॅसेट युग' म्हणून ओळखला जातो. त्या काळात, तसेच पुढे 'सीडी'चा जमाना आल्यानंतरही त्यांच्या आवाजात संतांची व

देवस्थानांची महती गाणाऱ्या रचनांचे अनेक संग्रह आले. आजतागायत किती संग्रह निघाले हे मात्र ते सांगत नाहीत. ''आजवर माझ्या किती मैफिली झाल्या, किती कॅसेट-सीडीज निघाल्या हे मी कधीही मोजलं नाही. लोक मला विचारतात, तुम्ही कॅसेटची नोंद का ठेवत नाही? पण मला त्याची आवश्यकता वाटत नाही. कुठल्या तरी अज्ञात शक्तीच्या प्रेरणेनं हे काम माझ्याकडून घडत आहे. त्या कामाची नोंद ठेवणारा मी कोण?

कदाचित याच भावनेतून पंडित अजित कडकडे संगीताकडे एका आध्यात्मिक दृष्टीनं बघत असावेत. संगीत आणि अध्यात्म यांच्या संबंधाविषयी विचारलं असता ते म्हणाले, ''मुळात आपल्या संगीतातच अध्यात्म आहे. आपल्या प्राचीन चार वेदांपैकी सामवेद हा संगीताशी संबंधित आहे. भक्तिगीतं गाताना आपल्यातला अहंकार लोप पावत असल्याचा अनुभव मला येत गेला. मी पैसे मिळवण्यासाठी गात असेन तर हा अनुभव मला येणार नाही. संतांच्या रचनांमध्ये, त्यांच्या विचारामध्ये आपण डुंबलो तर आपल्यातले षड्रिपु हळुहळू लोप पावतात अशी माझी श्रद्धा आहे. अर्थात ही वरवरची किंवा पाच-दहा वर्षांची प्रक्रिया नसून त्यासाठी खूप मोठा काळ जावा लागेल. अनेक जन्म घ्यावे लागतील. पण ही प्रक्रिया कुठंतरी सुरू झाली आहे, हे निश्चित!''

संगीत क्षेत्रातल्या आगामी योजना, भावी संकल्प यांविषयी बोलायला कडकडे खरं तर इच्छुक नसतात. ''मी गाण्याकडे अजिबात येणार नव्हतो, पण ईश्वरी शक्तीच्या प्रेरणेनं मी आलो, इथेच रमलो. त्यासाठी मी कोणताही संकल्प केला नव्हता. मग भविष्यातल्या योजनांचा संकल्प का करू? संकल्प करण्याचा मला अधिकारच नाही. करवून घेणारा 'तो' आहे. त्याच्यावर श्रद्धा ठेवली म्हणजे तो आपल्याकडून योग्य ते कार्य करून घेतो. त्यामुळेच आपल्या हातून अमुक गोष्ट घडली नाही किंवा हे करायचं राहून गेलं, अशा प्रकारची खंत मला वाटत नाही.''

संगीत क्षेत्राचं आजचं चित्र कसं आहे या प्रश्नावर 'खूपच छान!' असं मत ते नोंदवतात. ''सर्व क्षेत्रांप्रमाणे संगीतातही बदल झालेत नि ते अपरिहार्य आहेत. खाणं-पिणं, वेशभूषा, पादत्राणे यातले बदल आपण 'फॅशन' या नावाखाली जसे स्वीकारतो तसे संगीत क्षेत्रातले बदलही स्वीकारले पाहिजेत. पन्नास वा ऐंशी वर्षांपूर्वी जसं शास्त्रीय संगीत गायलं जाई तसं आज गायलं जात नाही. तशी अपेक्षाही करू नये. जग बदलत आहे, पुढे जात आहे. कितीही बदल झाले तरी शास्त्रीय संगीत हे अथांग महासागरासारखं आहे. कितीही नद्या येऊन मिळाल्या तरी महासागराचा आकार बदलत नसतो. तेव्हा बदलाची चिंता न करता त्याला सामोरं जायला हवं. शेवटी श्रद्धा, परिश्रम आणि गुरूप्रति असलेली निष्ठा या मूल्यांना तर पर्याय नाही ना!'

संगीत क्षेत्रात करिअर घडवू पाहणाऱ्या तरुणांना उपदेश नव्हे, तर मित्रत्वाचा सल्ला देण्यासाठी ते म्हणतात, ''तुम्ही कोणतंही संगीत शिका, पण एक गोष्ट मनाशी ठरवा, आपल्या गुरुविषयी कधीही वाईट बोलायचं नाही. एका गुरुकडून दुसऱ्या गुरुकडे गेलात तरी चालेल, पण कोणाचीही निंदा करू नका. निंदा केली तर ती आपल्याला भोवते. त्याचा परिणाम आपल्या व्यक्तिमत्त्वावर होतो. गुरुनं जे सांगितलं त्यानुसार केलं तर आपलं चांगलंच होतं, हा माझा अनुभव आहे. अभिषेकी बुवांनी मला ज्या हिताच्या चार गोष्टी सांगितल्या त्या मी कटाक्षानं पाळत आलो. त्याबरोबरच ईश्वराची कृपा आणि संतांचे आशीर्वाद यांच्या बळावर इथवर पोहोचलो. साईबाबांविषयी माझ्या मनात नितांत श्रद्धा आहे. त्यांच्या डोळ्यांत जी अपार करुणा आहे, ती माझ्या दृष्टीनं खूप महत्त्वाची आहे. ही करुणाच आपल्याला तारून नेत असते...''

■■■

## साई प्रश्नमंजुषा विजेत्यांची नावे



साई प्रश्नमंजुषेच्या दुसऱ्या भागालाही वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिडशेहून अधिक वाचक यात सहभागी झाले. २५ हून अधिक वाचकांनी पहिल्या प्रयत्नातच १०/१० गुण मिळवले आहेत. पैकी ज्या वाचकांनी आम्हाला ई-मेल द्वारे त्यांची नावं कळवली ती पुढीलप्रमाणे :

**जयश्री देशमुख**– बदलापूर, **हर्षद रामप्रसाद**– गोळवा, संगमनेर, **अश्विनी वझे**– तळेगाव, **जयंत डोंगरे**– यवतमाळ, **नंदकुमार जोशी**– मुंबई, **प्रा. उमाकांत कदम**– पुणतांबा, **मकरंद पुंडलिक**– कल्याण, **निखिल जगदाळे**– पुणतांबा, **अनेशा शेंडे**– वर्धा, **विजया पेठकर**– अमरावती, **प्रतीक रोकडे**– नागपूर, **प्रकाश परब**– अंधेरी, मुंबई, **प्रणय चिंदे**– मिरज, **भारती भोसले**– बारामती, **दिलीप धामणे**– हिंगोली, **स्वाती गांवस**– म्हापसा गोवा, **सचिन विभुते**– सोलापूर, **अंकुश घोडके**– पारवाल, अंबड, **साईली बांदेकर**– कारवार, **विद्या गोर्डे**– राहाता, **राजेंद्र थोरात**– जवळके ता. कोपरगाव, **अमरेश शेरलेकर**– दादर, मुंबई, **शैलेंद्र खोत**– मालाड पश्चिम, मुंबई, **सिध्देश गांवस**– म्हापसा, गोवा, **मुरलीधर हरिश्चंद्र धंबा**– वेसवी (वाल्मिकीनगर), मंडणगड, **कुलदीप साळुंखे**– फारणेवाडी, ता. वाळवा, **दामिनी पाटील**– अलिबाग, **राजेंद्र भोसले**– बारामती, **भुपालाल क्षत्रीय**– नागपूर, **सागर जगदाळे**– पुणतांबा, **अंकुश घोडके**– औरंगाबाद, **मारोती कुट्टुरवार**– नांदेड, **उत्कर्षा चिंदे**– मिरज, **अजित गोसावी**– मुंबई, **सुधाकर पेठकर**– अमरावती

**सप्टेंबर-ऑक्टोबरच्या अंकातील प्रश्नमंजुषेला सर्वप्रथम बिनचूक प्रतिसाद**



**प्रविण वसंत लहारे**
द्वारकामाई नगर,
ता. राहता, जि. नगर

अचूक उत्तर देणाऱ्या अन्य वाचकांची नावे पान – २८ वर

**मागील अंकातील प्रश्नांची उत्तरे**

१) गोविंद रघुनाथ दाभोलकर
२) आवो साई
३) सटका
४) श्रद्धा आणि सबुरी
५) दसरा
६) द्वारकामाई
७) बुट्टीवाडा
८) म्हाळसापती
९) प्राचिन शस्त्रास्त्रे
१०) साई आश्रम

**तुम्ही फक्त एवढंच करायचं –**

१) आपल्या फोनवरील Camera किंवा QR Scanner App उघडून खाली दिलेला QR Code स्कॅन करावा. २) क्विझचं पान आपोआप न उघडल्यास स्क्रीनवरील लिंक उघडावी. ३) सर्वप्रथम आपला email ID दिलेल्या जागी भरावा. ४) यानंतर सर्व प्रश्नांची अचूक उत्तरे निवडावी व शेवटी Submit करावे. ५) उत्तरे submit केल्यावर आपल्याला आपले गुण पाहता येतील. उत्तरे पुढील अंकात छापली जातील. ६) कुठलाही प्रश्न तुम्हाला कठीण वाटला, तर हाच अंक बारकाईने वाचा; तुम्हाला त्या प्रश्नाचं उत्तर याच अंकात सापडेल.

**Visit this link : bit.ly/saiquiz3**
**or Scan QR Code to play the quiz!**

# साई प्रश्नमंजुषा



नोव्हेंबर–डिसेंबर २०१९

**१) आधुनिक विज्ञानाच्या साह्याने शिर्डीत कोणता नवा प्रकल्प साकार होत आहे ?**
अ) साई नॉलेज पार्क
ब) साई टेक्निकल इन्स्टिट्यूट
क) साई भूजल संशोधन
ड) आय. टी. आय.

**२) साईसच्चरितचे लेखक गोविंद रघुनाथ दाभोलकर यांचे टोपणनाव कोणते?**
अ) दामाजीपंत
ब) हेमाडपंत
क) बाळाजीपंत
ड) विसाजीपंत

**३) रुग्णांना साईबाबा औषध म्हणून काय देत?**
अ) मंतरलेलं पाणी
ब) उदी
क) काढा
ड) मलम

**४) सामान्यतः साईंच्या कपड्यांचा रंग कोणता होता?**
अ) लाल
ब) हिरवा
क) काळा
ड) पांढरा

**५) तारीफ तेरी निकली है दिल से, होंठों पे आयी है बनके ......?**
अ) कव्वाली
ब) रुदाली
क) रागदारी
ड) गजाली

**६) माझ्या समाधीची ...... चढेल?**
अ) शिडी
ब) ओसरी
क) गच्ची
ड) पायरी

**७) बाबांना कोणते फूल सर्वात आवडत असे ?**
अ) मोगरा
ब) गुलाब
क) चाफा
ड) झेंडू

**८) साईंनी गीतेच्या कोणत्या श्लोकाचं विवेचन केलं आहे?**
अ) यदा यदा हि धर्मस्य...
ब) कमर्ण्ये वाधिकारस्ते
क) धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे
ड) तव्दिध्दि प्रणिपातेन

**९) महामारी घालवण्यासाठी बाबांनी स्वतः पीठ दळून कुठे फेकलं?**
अ) अंगणात
ब) विहिरीत
क) शिवेवर
ड) नदीत

**१०) गुणवत्तेबद्दल साई प्रसादालयाला कोणतं प्रमाणपत्र मिळालं आहे ?**
अ) आय. ए. एस.
ब) आय. एन. एस.
क) आय. सी. एस.
ड) आय. एस. ओ.

# शिर्डीतील दसरा उत्सव

शिर्डी वृत्त



**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने आयोजित केलेल्या १०१वा पुण्यतिथी उत्सवास मंगलमय वातावरणात पार पडला. पहाटे श्रींच्या फोटो व पोथीच्या मिरवणुकीने सुरुवात झाली. मुंबई येथील द्वारकामाई मंडळाने प्रवेशद्वारावर उभारलेल्या 'शिव महाव्दार' या देखाव्याने साईभक्तांचे लक्ष वेधून घेतले.

उत्संवाच्या प्रथम दिवशी पहाटे ४.३० वाजता श्रींची काकड आरती झाली. त्यानंतर श्री साईबाबांच्या प्रतीमेची व श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक मुगळीकर यांनी पोथी, वैद्यकीय प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रितम वडगावे यांनी वीणा आणि लेखाधिकारी कैलास खराडे व विधी अधिकारी गोरक्षनाथ नलगे यांनी प्रतिमा धरून सहभाग नोंदवला. या मिरवणुकीत विश्वस्त ॲड. मोहन जयकर, विश्वस्त तथा नगराध्यक्षा श्रीमती अर्चनाताई कोते, सौ. सरस्वती वाक्चौरे व प्रशासकीय अधिकारी सूर्यभान गमे हे सहभागी झाले होते. मिरवणूक द्वारकामाईत आल्यानंतर श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाच्या अखंड पारायणास प्रारंभ झाला. अधीक्षक पोपट निर्मळ यांनी प्रथम, अधीक्षक सतीश कासार यांनी द्वितिय, कृषी अधिकारी अनिल भणगे यांनी तृतीय, विभाग प्रमुख किशोर गवळी यांनी चौथ्या व विभाग प्रमुख अशोक वाळुंज यांनी पाचव्या अध्यायाचे वाचन केले.

सकाळी ६.०० वाजता समाधी मंदिरात संस्थानचे अधीक्षक विजय सिनकर यांच्या हस्ते श्रींची पाद्यपूजा केली. दुपारी ४.०० वाजता ह.भ.प. श्री. गंगाधरबुवा व्यास, डांबिवली यांचे कीर्तन झाले, रात्रौ ७.०० ते १०.०० या वेळेत पंडित उदय मलिक, दिल्ली व यशश्री कउलसकर, पुणे यांचा भजनसंध्या हा कार्यक्रम संपन्न झाला. रात्रौ ९.१५ वाजता गावातून पालखीची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीनंतर रात्रौ १०.३० वाजता श्रींची शेजारती झाली. तर, अखंड पारायणासाठी द्वारकामाई मंदिर रात्रभर खुले ठेवण्यात आले.

उत्सवाच्या मुख्य दिवशी मंगळवार दिनांक ०८ ऑक्टोबर रोजी पहाटे काकड आरती, अखंड पारायण समाप्ती व श्रींच्या फोटोची आणि पोथीची मिरवणूक, श्रींचे मंगलस्नान व नंतर श्रींची पाद्यपूजा, भिक्षाझोळी आदी कार्यक्रम झाले.

**पुण्यतिथी उत्सवाचा मुख्य दिवस**

श्री साईबाबा संस्था विश्वस्तव्यवस्था शिर्डीच्या वतीने आयोजित केलेल्या १०१ वा श्री पुण्यतिथी उत्सवाच्या मुख्य दिवशी मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले असल्यामुळे लाखो साईभक्तांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.

उत्सवाच्या मुख्य दिवशी संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे व सौ. नलिनी हावरे, विश्वस्त भाऊसाहेब वाक्चौरे व सौ. सरस्वती वाक्चौरे, ॲड. मोहन जयकर व सौ. स्मिता जयकर आणि विश्वस्त तथा नगराध्यक्षा श्रीमती अर्चनाताई कोते आदींनी श्री पुण्यतिथी उत्सवात आपला सहभाग नोंदविला.

उत्सवाच्या मुख्य दिवशी पहाटे ४.३० वाजता श्रींची काकड आरती झाल्यानंतर श्री साईसच्चरित्र या पवित्र ग्रंथाच्या अखंड पारायणाची समाप्ती झाली. पारायण समाप्तीनंतर श्री साईबाबांच्या प्रतिमेची व श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची मिरवणूक काढण्यात




आली. या मिरवणुकीत संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक मुगळीकर यांनी पोथी, अधीक्षक पंढरीनाथ शेकडे यांनी विणा आणि अधीक्षक विठ्ठल बर्गे व अधीक्षक राजेंद्र जगताप यांनी प्रतिमा धरुन सहभाग नोंदवला.

सकाळी १०.०० वाजता ह.भ.प. श्री. गंगाधरबुवा व्यास, डोंबिवली यांचे कीर्तन झाले. ५.०० वाजता खंडोबा मंदिर येथे सीमोल्लंघन करण्यात आले. सायंकाळी ६.१५ वाजता श्रींची धूपारती झाली. तर, रात्रौ. ७.०० ते १०.०० या वेळेत पंडित सुगाटो भादुरी, कोलकाता यांच्या क्लासिकल मंडोलिन आणि भजन कार्यक्रमास श्रोत्यांनी भरभरून दाद दिली. रात्रौ ९.१५ वाजता श्रींच्या रथाची शिर्डीतून मिरवणूक काढण्यात आली.

उत्सवाच्या तिसऱ्या दिवशी बुधवार, दिनांक ०९ ऑक्टोबर रोजी दुपारी ०४.०० वाजता ह.भ.प. श्री. गंगाधरबुवा व्यास, डोंबिवली यांचा कीर्तनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ०७.०० ते १०.०० या वेळेत पद्मश्री कुचीपुडी डान्स अकॅडमी, हैद्राबाद यांचा कुचीपुडी नृत्य कार्यक्रम होऊन रात्रौ १०.३० वाजता शेजारती झाली.

श्री पुण्यतिथी उत्सवाची सांगता ह.भ.प. श्री. गंगाधरबुवा व्यास, डोंबिवली यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.

उत्सवाच्या सांगता दिनी सकाळी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक मुगळीकर व त्यांची पत्नी सौ. जयश्रीताई मुगळीकर यांच्या हस्ते श्री गुरुस्थान मंदिरात रुद्राभिषेक पूजा करण्यात आली. तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र ठाकरे व त्यांची सुविद्य पत्नी सौ. वैशाली ठाकरे यांच्या हस्ते समाधी मंदिरात श्रींची पाद्यपूजा करण्यात आली.

तसेच रात्रौ ७.०० ते १०.०० यावेळेत श्रीमती अश्विनी जोशी, नाशिक यांचा भजनसंध्या कार्यक्रम झाला.

हनुमान मंदिराशेजारील श्री साईबाबा रात्रौ ०९.१५ वाजता श्रींची गुरुवारची नित्याची पालखीमिरवणूक निघाली.

**पुण्यतिथी उत्सव काळात ३ कोटी देणगी प्राप्त**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने आयोजित दि. ०७ ऑक्टोबर ते दि. १० ऑक्टोबर २०१९ या कालावधीत साजरा करण्यात आलेल्या १०१व्या श्री पुण्यतिथी उत्सवात सुमारे ०२ लाख २५ हजार साईभक्तांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक मुगळीकर यांनी दिली.

मुगळीकर म्हणाले, श्री पुण्यतिथी उत्सवात सशुल्क व ऑनलाईन पासेसद्वारे एकूण ५७,४३,८००/- रुपये देणगी प्राप्त झाली. तसेच श्री साईप्रसादालयात उत्सवकाळात २,०५,७३५ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा लाभ घेतला व ४३ हजार ४२२ साईभक्तांनी अन्नपाकिटांचा लाभ घेतला. याबरोबरच १,०२,१६८ लाडू पाकिटांची विक्री करण्यात आली असून, याव्दारे २५,५४,२००/- रुपये प्राप्त झाले. तर, २,१७,२०० मोफत बुंदी प्रसाद पाकिटांचे दर्शनरांगेतून साईभक्तांना वाटप करण्यात आले.

तसेच, श्री पुण्यतिथी उत्सवकालावधीत साईआश्रम भक्तनिवास, व्दारावती भक्तनिवास, साईधर्मशाळा, श्री साईबाबा भक्तनिवास (५०० खोल्या) व साईप्रसाद निवास आदी निवासांद्वारे ५८,३७४ साईभक्तांची निवासाची व्यवस्था करण्यात आली. तर, अतिरिक्त निवासव्यवस्थेसाठी उभारण्यात आलेल्या मंडपांत ५,६२७ साईभक्तांची निवासाची व्यवस्था करण्यात आली. अशी एकूण ६४,००१

## पुण्यतिथी उत्सवातील क्षणचित्रे









पुण्यतिथी उत्सवातील क्षणचित्रे

साईभक्तांची निवासाची व्यवस्था करण्यात आलेली होती.

उत्सवकाळात दानपेटीतून १,७३,८५,४१६/- रुपये, देणगी काउंट द्वारे ९१,०३,४७४/-, डेबिट क्रेडिट कार्ड, ऑनलाईन देणगी, चेक/डीडी, मनीऑर्डर आदींद्वारे १,०८,७६,४५०/- रुपये देणगी रक्कम स्वरूपात प्राप्त झालेली आहे. तसेच, सोने ३७५.९३० ग्रॅम (रुपये १२ लाख ६७ हजार) व चांदी ३११०.३५० ग्रॅम (रुपये ८३ हजार), सुमारे १९ देशांमधून परदेशी चलनांव्दारे ४,७०,९०३/- रुपये देणगी प्राप्त झालेली आहे.

तसेच भिक्षाझोळीत गहू, तांदूळ, बाजरी, ज्वारी, गूळ व खाद्य तेल आदींद्वारे २,६१,५२९/- रुपये व ६५,०७२/- रुपये रोख रक्कम अशी एकूण ३,२६,६०१/- रुपये इतकी देणगी प्राप्त झालेली असून, अशा सर्व मार्गाने एकूण ३ कोटी ९५ लाख १२ हजार ८४४ रुपये देणगी प्राप्त झाली असल्याचे श्री. मुगळीकर यांनी सांगितले.

**दीपावली निमित्त रोषणाई**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डीच्या वतीने दिपावलीनिमित्त समाधी मंदिर व परिसरात विद्युत रोषणाई व आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. अशी माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक मुगळीकर यांनी दिली.

श्री. मुगळीकर म्हणाले, दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी दिपावली उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त समाधी मंदिर व परिसरात शनि शिंगनापुर येथील गणेश शेटे, शनेश्वर डेकोरेर्टस यांच्या वतीने विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

■■■


# भगवद्‌गीते विषयीचं गांधींचं चिंतन

नीता कुलकर्णी

भगवद्‌गीता हा आध्यात्मिक तत्वज्ञान सांगणारा एक महत्त्वाचा ग्रंथ! शतकानुशतकं अभ्यासक, विचारवंत, आध्यात्मकमार्गातले लोक आणि सामान्य लोकांना या ग्रंथाने भुरळ घातली आहे. अठरा अध्यायात भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला जीवनासंदर्भात अनेक गोष्टींविषयी मार्गदर्शन केलं आहे. आज इतकी वर्षं झाली, तरी गीतेबाबत कुतूहल संपलेलं नाही. गीतेचा भावार्थ शोधण्याचा अभ्यास संपत नाही.

महात्मा गांधी याचं 'भगवद्‌गीता – गांधीजींच्या चिंतनातून' हे पुस्तक रोहन प्रकाशनतर्फे प्रकाशित झालं आहे. मूळ इंग्लिश पुस्तकाचा ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक भगवान दातार यांनी अनुवाद केला आहे. जनसामान्यांसाठी महात्मा गांधी यांनी केलेलं हे विवेचन प्रामुख्याने अनासक्ती योग, सत्यपालन आणि कर्मयोगाबद्दल त्यांची मतं वाचकांसमोर मांडतं. हेच या पुस्तकाचं सर्वांत महत्वाचं वैशिष्ट्य आहे.

महात्मा गांधी यांची विचारधारा आणि त्यांची जीवनशैली लक्षात घेता या दोन्ही संकल्पनांचं त्यांच्या आयुष्यातलं स्थान किंवा महत्व आपल्याला अधिक तीव्रतेने जाणवतं. सामान्य माणसाला त्यांच्या जीवानात पडणाऱ्या आध्यात्मिक प्रश्नांबाबत गांधीजींनी अगदी नेमकेपणाने विवेचन केलं आहे. त्यांनी या पुस्तकाच्या आरंभी या लेखनाचा किंवा विवेचनाचा उद्देश सांगताना म्हटलंय, की ज्या लोकांकडे गीतेच्या सखोल अभ्यासासाठी पुरेसा वेळ नाही किंवा आवश्यक ते मार्गदर्शन




नाही, पण त्यांना आयुष्याच्या अनेक टप्प्यांवर गीतेच्या उपदेशाची गरज तर आहे, अशांसाठी हे उत्तम आध्यात्मिक गाईड आहे. आणि याचं प्रत्यंतर वाचकाला अगदी पानोंपानी येत राहतं.

सर्व वैदिक ग्रंथांनी केलेल्या उपदेशाचं गीता हे सार आहे. आपली कर्तव्य पूर्ण करण्यासाठी कृती करण्याचं आवाहन करणारा हा ग्रंथ आहे. धार्मिक तत्वज्ञानाला बौद्धिक आधार देणारा हा ग्रंथ आहे. हे असं शाश्वत तत्वज्ञान आहे की ते साऱ्या मानवतेसाठी वरदान आहे. ही शुद्ध नीतीमूल्यांची शिकवण आहे.

गांधीजींनी हे पुस्तक लिहिलं – २४ फेब्रुवारी ते २७ नोव्हेंबर १९२६ या काळात! साबरमती आश्रमात या काळात त्यांचं वास्तव्य असताना बहुतांश वेळ ते गीतेचं संस्कृत मधून गुजराती भाषेत अनुवाद करत असत. त्या दरम्याने त्यांचा गीतेचा तपशिलाने विचार सुरू होता. सकाळच्या प्रार्थनेनंतर ते नियमितपणे गीतेवर भाष्य करत. यावेळीते जे बोलत ते त्यांचे सहायक लिहून घेत असत. त्यांचं हे चिंतन उत्स्फूर्त असे. हे बोलण्यापूर्वी ते कोणतीही पूर्वतयारी करत नसत. त्यामुळे हे भाष्य अगदी सहज सोप्या भाषेत आलं आहे आणि म्हणूनच ते वाचकांना भावणारं आहे. गांधीजींचं हे भाष्य प्रथम गुजराती भाषेत प्रसिद्ध करण्यात आलं आणि नंतर इंग्लिशमध्ये प्रकाशित झालं. आणि आता ते मराठीत उपलब्ध झालं आहे.

गीताच्या १८ ही अध्यायांवर गांधीजींनी भाष्य केलं आहेच, शिवाय एक विस्तृत प्रस्तावना आणि सविस्तर उपसंहार या पुस्तकात त्यांनी लिहिला आहे. मूळ अध्यायांकडे वळण्यापूर्वीही प्रस्तावना वाचून हे पुस्तक नेमकं काय आहे, त्याची रचना काय आहे. आणि ते लिहिण्यामागचा गांधीजींचा विचार काय आहे, हे वाचकांना कळेल.

गीतेने जो संदेश दिला आहे, त्यात प्रामुख्याने– आपलं कर्म, आपलं कर्तव्य करत रहा, फलाची अपेक्षा करू नका, सत्याची कास धरा, त्यासाठी प्रसंगी कटू निर्णय घ्यावे लागले तरी हरकत नाही.– हा संदेश आहेच, पण या जोडीला अनेक आध्यात्मिक संकल्पनांचा उहापोह कृष्णांनी केला आहे. या पुस्तकाचा अत्यंत प्रासादिक भाषेत अनुवाद भगवान दातार यांनी केला आहे. पुस्तक जरी इंग्लिश भाषेतील असले, तरी त्यावरचाही संस्कृत भाषेचा पगडा अगदी ठळकपणे जाणवतो. तत्वज्ञान, संस्कृत, आध्यात्म, संस्कृती अशा अनेक गोष्टींत जाणकार असाल तरच असे अनुवाद जमून येतात.

रोहन प्रकाशनानं पुस्तकाची निर्मिती मूल्य फार कसोशीने जपली आहेत, एकुणात प्रत्येक घरात हे पुस्तक हवंच, इतकं त्याचं महत्व आहे.

■■■